**दिनांक २२/०२/२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी | अध्यक्ष |
| २. | प्रतिनिधी जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| ३. | उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) | |
| ४. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ५. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ६. | सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ७. | सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| ९. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| १०. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ११. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| १२. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| १३. | मुख्याधिकारी, नगर पंचायत खेड | सदस्य |

---

उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

1. **मा. एमसीझेडएमए, मुंबई कडील प्रलंबित तक्रारींबाबत आढावा –**

मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींची बैठक दिनांक 27/07/2023 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा. एमसीझेडएमए, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या प्रलंबित तक्रारींचे अनुषंगाने आढावा घेण्यात आला.

मा. अध्यक्ष, एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून सन 2019 ते 2023 पर्यंत प्राप्त 31 तक्रारींबाबतचा विहित नमुन्यातील तपशील पुढीलप्रमाणे आहे -

| | Construction in NDZ area within CRZ area | Constructions in CRZ II/ III without CRZ permission from competent authority | Construction beyond CRZ permission | C&D waste/ Debris dumping in Mangroves & its 50 m. buffer, CRZ I | Total |
|---|---|---|---|---|---|
| Complaint received | 06 | 17 | 0 | 08 | 31 |
| Action Taken | 02 | 07 | 0 | 05 | 14 |
| Action pending with reason | 04<br>03-Pending at Court for hearing.<br>01-Report received | 10<br>02- Pending at Court for hearing.<br>02-Pending at Chief | 0 | 03<br>01-Pending at Sub Divisional Office for report (site inspection | 17 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | from SDO, Dapoli. But pending at this office for compliance report | Office, Nagar Panchayat /Parishad.<br>03- Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>01-Report received from SDO, Dapoli. But pending at this office for compliance report<br>02- Complaint at Sr.no. 2,6 of 2023 not received to this office | | and measurement).<br>02-Pending at MPCB, Chiplun for report. | |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता तक्रारींचे अनुषंगाने पुर्तता अहवाल सादर करणेवर प्रलंबित तक्रारींची संख्या 12 व मा. न्यायालयात प्रलंबित तक्रारी 5 आहेत. सदर तक्रारी या सन 2019 पासून प्रलंबित असलेमुळे अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली असलेबाबत उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) यांनी उपस्थित सदस्य यांना सांगितले. पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधित उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांजकडे यापुर्वी पाठविलेल्या असल्या तरी पुनश्च अनुपालन अहवालासाठी पाठविणेत याव्यात असे निर्देश सदस्य सचिव यांनी दिले. जेणेकरुन तक्रारींचे अनुषंगाने पुढील कार्यवाही प्रस्तावित करता येवु शकेल. तसेच उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांजकडून प्राप्त अहवाल प्रकरणी तात्काळ पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई यांजकडे अनुपालन अहवाल सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.

मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींचे अध्यक्ष यांची दरमहा बैठक आयोजित करण्यात येत असलेमुळे माहे जानेवारी 2024 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी/ मुख्याधिकारी तथा सदस्य यांना निर्देश देण्यात आले.

## 2. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

रत्नागिरी जिल्हयातील सीआरझेड क्षेत्रातील बांधकामाबाबत प्राप्त झालेल्या मा. एमसीझेडएमए, मुंबई व अन्य व्यक्तींकडील तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. –

| उपविभाग | माहे डिसेंबर 2023 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2024 ते फेब्रुवारी 2024 मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 17 | 2 | 19 | 2 | 17 | 2 | 15 | 9 | 6 |
| खेड | 3 | 0 | 3 | 0 | 3 | 0 | 3 | 0 | 3 |
| चिपळूण | 9 | 1 | 10 | 1 | 9 | 3 | 6 | 4 | 2 |
| रत्नागिरी | 21 | 0 | 21 | 0 | 21 | 2 | 19 | 10 | 9 |
| राजापूर | 7 | 0 | 7 | 0 | 7 | 1 | 6 | 1 | 5 |
| | 57 | 3 | 60 | 3 | 57 | 8 | 49 | 24 | 25 |

| उपविभाग | MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या | अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या |
|---|---|---|---|
| दापोली | 3 | 12 | 15 |
| खेड | 2 | 1 | 3 |
| चिपळूण | 2 | 4 | 6 |
| रत्नागिरी | 5 | 14 | 19 |
| राजापूर | 3 | 3 | 6 |
| | 15 | 34 | 49 |

आवक तक्रारी व निकाली तक्रारी यांचा मेळ घेतला असता निकाली तक्रारींची संख्या खूप कमी असलेचे सदस्य सचिव यांनी सांगितले.

| कार्यालय | प्रलंबित प्रकरणांचा तपशील | दिलेल्या सूचना |
|---|---|---|
| उप प्रादेशिक अधिकारी, चिपळूण | कोतवली सोनपात्रा नदीमधील पाणी प्रदुषणाचा अहवाल उपविभागीय अधिकारी यांना सन 2020 मध्ये पाठविणेत आलेला आहे. सदर अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे ई-मेल द्वारे सादर करणेत आला आहे असे सांगणेत आले आहे. तसेच केळशी समुद्रकिना-यावर प्लास्टीक तसेच इतर तत्सम वस्तु टाकून प्रदुषण केलेबाबतचे तक्रार प्रकरणी ग्रामपंचायत केळशी यांना लेखी पत्र देणेत आले आहे. | ग्रामपंचायत केळशी यांजकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा पुर्तता अहवाल उप प्रादेशिक अधिकारी यांनी त्यांचेमार्फत या कार्यालयास सादर करावा. |
| उपविभागीय अधिकारी दापोली | 4 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 9 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. 1 प्रकरण प्रदुषण विभागाकडील आहे.1 प्रकरणामध्ये दावा दाखल करणेवर प्रलंबित आहे. | न्यायालयीन स्तरावरील प्रकरणांची सदयस्थिती पुढील बैठकीपुर्वी अदयावत करावी. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |
| उपविभागीय अधिकारी चिपळूण | 1 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 4 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. 1 प्रकरण मुख्याधिकारी, न.पं. गुहागर यांजकडे अहवालासाठी प्रलंबित आहेत. तसेच 1 प्रकरणामध्ये अहवाल सादर करण्यात आला आहे. | न्यायालयीन स्तरावरील प्रकरणांची सदयस्थिती पुढील बैठकीपुर्वी अदयावत करावी. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. तसेच अदयावत यादी बैठकीपुर्वी सादर करावी. |
| उपविभागीय अधिकारी राजापूर | 1 प्रकरणांमध्ये तहसीलदार राजापूर यांचा अहवाल प्राप्त झाला आहे. 2 प्रकरणांमध्ये मोजणीसाठी भुमी अभिलेख स्तरावर प्रलंबित असून पोलीस संरक्षणामध्ये मोजणीची कार्यवाही पुर्ण करणेत येणार आहे. 1 प्रकरणांमध्ये मोजणीची कार्यवाही पुर्ण झालेली असुन मोजणी नकाशा प्राप्त होणेवर प्रलंबित आहे. 1 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. तसेच 1 प्रकरणामध्ये मोजणी होणेची आहे. | भुमी अभिलेख कार्यालयाशी बैठक आयोजित करुन मोजणीबाबत कार्यवाही पुढील बैठकीपुर्वी पुर्ण करुन घ्यावी. |
| उपविभागीय अधिकारी खेड | 1 प्रकरणांमध्ये मोजणीसाठी भुमी अभिलेख स्तरावर प्रलंबित आहे सदर कामी पोलीस संरक्षणामध्ये मोजणीची कार्यवाही पुर्ण करणेत येणार आहे. 1 प्रकरण मुख्याधिकारी यांचे स्तरावरील व 1 प्रकरण प्रदुषण विभागाकडील आहे. | भुमी अभिलेख कार्यालयाशी बैठक आयोजित करुन मोजणीबाबत कार्यवाही पुढील बैठकीपुर्वी पुर्ण करुन घ्यावी. मुख्याधिकारी यांचे स्तरावरील प्रकरणांमध्ये पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |

| | | |
|---|---|---|
| उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | 2 प्रकरणांमध्ये बांधकाम निष्कासनाची नोटीस व आदेश देण्यात आले आहेत. 6 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 1 प्रकरणांमध्ये मोजणीसाठी भुमी अभिलेख स्तरावर प्रलंबित आहे. 10 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. | न्यायालयीन स्तरावरील प्रकरणांची सदयस्थिती पुढील बैठकीपुर्वी अदयावत करावी. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |

तरी प्रलंबित तक्रारी अर्जामध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे निर्देश देण्यात आले.

उपविभागीय अधिकारी खेड व राजापूर यांचे स्तरावरील मोजणीचे प्रकरण बराच कालावधीपासून प्रलंबित आहे. तरी भूमी अभिलेख विभागाची बैठक आयोजित करुन मोजणीची कार्यवाही प्राधान्याने पुर्ण होईल याकडे लक्ष पुरवावे अश्या सुचना देण्यात आल्या. तसेच मुख्याधिकारी स्तरावरील प्रलंबित प्रकरणांमध्ये जिल्हा सह आयुक्त, नपाप्र, रत्नागिरी यांनी विशेष लक्ष दयावे अश्या सूचना देण्यात आल्या

मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींचे अध्यक्ष यांची दरमहा बैठक आयोजित करण्यात येत असलेमुळे माहे जानेवारी 2024 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व संबंधितांना निर्देश देण्यात आले.

## 3. Status of violation cases and action taken on violation cases by States/Union Territories as per CRZ Notifications, 2011/2019

मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडील दिनांक 15/06/2023 रोजीच्या पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रामध्ये सीआरझेड तरतूदींचे उल्लंघन करुन करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे, त्यांची सदयस्थिती व त्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करणेचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत अनधिकृत बांधकामाबाबतची यादी प्राप्त झाली आहे. सदर यादी नुसार रत्नागिरी जिल्हयातील सीआझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची एकुण संख्या 1029 असुन उपविभाग निहाय गोषवारा पुढीलप्रमाणे आहे -

**सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत माहिती**

| पविभागाचे नांव | सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची संख्या | | | निर्गमित केलेल्या नोटिसांची संख्या | | | न्यायालयीन स्तरावर दाखल प्रकरणे | | | स्थगिती आदेश मिळालेली प्रकरणे | | | निष्कासनाचे आदेश पारीत संख्या | | | निष्कासनाची कार्यवाही केलेली संख्या | | | पर्यावरण कायदयांतर्गत गुन्हे दाखल केलेली संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CR. III |
| दापोली | 4 | 0 | 191 | 4 | 0 | 191 | 0 | 0 | 45 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 7 |
| मंडणगड | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकुण | 4 | 0 | 192 | 4 | 0 | 192 | 0 | 0 | 45 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 7 |
| खेड | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकुण | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| चिपळूण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| गूहागर | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 10 |
| एकुण | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 10 |
| रत्नागिरी | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| संगमेश्वर | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| एकुण | 0 | 0 | 145 | 0 | 0 | 145 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| राजापूर | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 494 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| लांजा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 494 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| जिल्ह्याची एकुण | 4 | 11 | 1014 | 4 | 11 | 1008 | 0 | 0 | 90 | 0 | 0 | 25 | 0 | 0 | 13 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 19 |

- उपविभाग राजापूर : राजापूर तालुक्यातील 500 प्रकरणांपैकी 494 प्रकरणांमध्ये नोटिसा देण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित 6 प्रकरणांमध्ये तहसीलदार राजापूर यांचेमार्फत अहवाल प्राप्त झालेनंतर नोटीसा देण्याचे काम प्राधान्याने पुर्ण करणेत येईल असे उपविभागीय अधिकारी राजापूर यांनी सांगितले

4. <u>मौजे अंजनवेल, ता. गुहागर येथे कोकण एल.एन.जी. प्रा.लि. कंपनीसाठीच्या ब्रेक वॉटर वॉलच्या विस्तारीकरणाच्या सुरु असलेल्या कामाबाबत -</u>

मौजे अंजनवेल, ता. गुहागर येथे कोकण एल.एन.जी. प्रा.लि. कंपनीसाठीच्या ब्रेक वॉटर वॉलच्या विस्तारीकरणाचे काम सुरु असलेबाबत श्री. विठ्ठल (बावा) विष्णू भालेकर, मु.पो. वेलदूर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी तथा सदस्य (DCZMA) यांच्या दिनांक 11/10/2022 रोजीच्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांचा दिनांक 18/04/2023 रोजीचे पत्रान्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे.

प्रस्तुत प्रकरणी सदयस्थितीचा वस्तुनिष्ठ अहवाल प्रादेशिक बंदर अधिकारी, रत्नागिरी मेरीटाईम बोर्ड यांचे अभिप्रायासह सादर करणेबाबत बंदर निरीक्षक, दाभोळ यांना दिनांक 21/08/2023 रोजीच्या बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते. तसेच उपविभागीय अधिकारी चिपळूण, उपविभाग चिपळूण यांना सदयस्थितीबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करणेबाबत दिनांक 21/08/2023 रोजीच्या बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते.

त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी, चिपळूण यांजकडील दिनांक 19/12/2023 रोजीचा अहवाल प्रादेशिक बंदर अधिकारी यांच्या दिनांक 18/12/2023 रोजीच्या अहवालासह प्राप्त झाला आहे. सदर अहवालानुसार मा. संचालक, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडे अहवाल सादर करणेत यावा असे दिनांक 29/12/2023 रोजीच्या बैठकीमध्ये ठरविणेत आले होते. मा. संचालक, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडे अहवाल सादर करणेपुर्वी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन घेवुन व सीआरझेड अधिसूचनामधील तरतूदींनुसार स्वयंस्पष्ट अहवाल तात्काळ सादर करावा असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

**5. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने आयोजित जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठकीमध्ये समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

**a) <u>कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –</u>**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 संदर्भात अन्य न्यायालयाकडील आदेश अथवा मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 चा अंतीम आदेश यांना अधीन राहून साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेच्या कार्यवाहीबाबत निर्णय घेणेत येईल.

b) पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. श्री. अनिल परब व श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचे नांवे असलेल्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करणेबाबत मासिक बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते.

उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 13/12/2023 रोजीचे पत्रान्वये संबंधितांच्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवुन महसूल वसुली प्रमाणपत्राचा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविणेत आले आहे. सदर पत्राचे अनुषंगाने उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांजकडील दिनांक 15/12/2023 रोजीचे पत्र या कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे. सदर पत्राचे अवलोकन केले असता जमीन महसूल वसुलीची कार्यवाही त्यांचे विभागाशी संबंधित नसलेबाबत या कार्यालयास कळविले आहे. जमीन महसूल वसुलीची कार्यवाही प्रदुषण विभागाशी संबंधित नसली तरी सदर वसुली करणेकामी सादर केलेल्या महसूल वसुली प्रमाणपत्र प्रस्तावामध्ये संबंधितांच्या जमिन मिळकतीची माहिती देणे आवश्यक असलेबाबत उपप्रादेशिक अधिकारी चिपळूण यांना यापुर्वीच्या बैठकीमध्ये तोंडी अवगत करण्यात आले आहे. तसेच **या कार्यालयाकडील दिनांक 23/01/2024 रोजीच्या पत्रान्वये लेखी कळविणेत आले आहे. तरी सदर पत्रानुषंगाने योग्य ती कार्यवाही उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी करावी. तसेच पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबत तहसीलदार दापोली/खेड यांचेमार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी लेखी अहवाल सादर करावा.** तसेच संबंधित संकलनास देखील इतीवृत्ताची प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविणेत येवुन त्यांचेकडुन पुढील बैठकीपुर्वी अहवाल प्राप्त करुन घ्यावा असे निर्देश देण्यात आले.

c) न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही –

i) मा. दिवाणी न्यायालय, खेड येथील दावा क्र. 57/2021

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 रोजीचा आदेश -**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 चे आदेशाविरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय, खेड येथे दिवाणी किरकोळ अपील क्र. 08/2023 दाखल करणेत आले असुन सदर अपीलाची अंतीम सुनावणी दिनांक 04/11/2023 रोजी झालेली असुन अपील मान्य करणेत आले आहे.

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 04/11/2023 रोजीच्या आदेशाविरुध्द अपील -**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 04/11/2023 रोजीच्या आदेशान्वये या कार्यालयामार्फत दाखल अपील मान्य करणेत आले आहे. सदर आदेश रद्द करणेबाबत श्री. सदानंद कदम यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. 14850/2023 दाखल केली असुन दिनांक 11/12/2023 रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सदर याचिका Pre-admission वर असुन सुनावणीची पुढील तारीख दिनांक 29/02/2024 रोजी ठेवण्यात आली आहे.

- **निशाणी-33 वरील अपीलबाबत -**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांजकडील निशाण 33 वरील दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द फेरतपासणी अपील क्र. Writ Petition WPST 26447/2023 उपविभागीय अधिकारी दापोली यांनी दिनांक 26/09/2023 रोजी दाखल केले आहे. सदर रिट याचिका Pre-admission वर आहे.

- **हस्तांतरण अर्जाबाबत (Transfer Application) -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दावा क्र. रेमुनं. 57/2021 दाखल आहे. सदर दावा हस्तांतरीत करणेबाबत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात Civil M.A. 11/2023 अन्वये हस्तांतरण अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रतिबादी श्री. सदानंद गंगाराम कदम तर्फे अॅड. नेने हजर झाले आहेत. प्रस्तुत अर्ज प्रकरणी अर्जदाराच्या युक्तीवादावर प्रलंबित आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 07/03/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

- **पुढील सुनावणी –**

रेमुनं. 57/2021 दाव्यामध्ये वादीने निशाणी 62 वर म्हणणे देणेसाठी, निशाणी 81 वर युक्तीवादासाठी व पुराव्यासाठी पुढील सुनावणीची तारीख दिनांक 05/04/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

**ii) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथील अर्ज क्र. 58/2021**

श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 02/05/2023 रोजी झाली असुन सदर दावा फेटाळून लावणेत (Dismissed) आला आहे.

**iii) मा. दिवाणी न्यायालय,खेड येथील दावा क्र. 12/2022**

मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड यांचे न्यायालयात 1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19 व 15 चे 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील क्रिमीनल रिव्हीजन अर्ज क्र. 11/2022 प्रलंबित असुन सदर अर्जावरील न्यायनिर्णय होईपर्यंत उक्त दावा अर्ज 12/2022 स्थगितीवर ठेवण्यात आलेला आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 23/04/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

**iv) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील दावा क्र. 11125/2022**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक 25/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11125/2022 दाखल केले आहे.

सदर दाव्यामध्ये अतिरिक्त मुद्दयांच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र आणि Interim Application उपविभागीय अधिकारी दापोली यांचेमार्फत दिनांक 04/10/2023 रोजी दाखल करणेत आले आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 22/02/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

6. **मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएकस/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत - डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर केलेले अतिक्रमण म.ज.म.अ.1966 चे कलम 50(3) व कलम 53 नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 च्या बाहेरील अतिक्रमण करण्यात आलेली शासकीय जमीन ही गाळाने तयार झालेली किना-यालगतची जमीन (Foreshore Land) आहे. सबब सीआझेड तरतूदींचे अनुषंगाने प्रशासकीय विभाग म्हणुन पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे? याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव मा. संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे त्यांचे अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तथापि अदयाप पर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

7. **तत्कालीन मंडळ अधिकारी, मुरुड यांचेविरुध्द करण्यात आलेली कारवाई –**

मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांजकडील दिनांक २४/०३/२०२३ रोजीचे पत्रान्वये पोलीस निरीक्षक, दापोली पोलीस ठाणे यांजकडील दिनांक २०/०३/२०२३ रोजीचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालाचे अवलोकन केले असता, पोलीस ठाणे दापोली यांचे येथे दाखल गुन्हा रजि. नं. १७७/२०२३ मध्ये श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांना आरोपी करण्यात आले असुन त्यांना दिनांक १५/०३/२०२३ रोजी अटक करण्यात आली होती. श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांची मा. न्यायालयाने दिनांक २०/०३/२०२३ रोजी जामीनावर मुक्तता केलेली आहे. श्री. पारदुले यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

**<u>प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना</u> –**

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.
२. मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करावी.
३. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणांची सदयस्थिती सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले. तसेच तपशिलामध्ये दाव्याची सुनावणीची पुढील तारीख व पुढील तारखेचे कारण नमुद करण्यात यावे.
४. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.
५. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.
६. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.
७. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत तथापी बराच काळ प्रलंबित आहेत, अशा प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित विभागाची बैठक आयोजित करुन व पाठपुरावा करुन अहवाल प्राप्त होतील याकडे लक्ष पुरवावे.

८. अभिप्राय अपेक्षिलेल्या प्रकरणांमध्ये वेळोवेळी संबंधित विभागास स्मरणपत्र काढणेची कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

**सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना —**

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.

२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.

४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.

५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

**सर्वसाधारण सूचना**

➤ सागरी किनारा व्यवस्थापन समिती, रत्नागिरी (DCZMA) च्या दरमहा आयोजित करण्यात येणा-या बैठकीचे लेखी पत्र तसेच इतिवृत्त या कार्यालयाच्या अधिकृत ई-मेल द्वारे पाठविणेत येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका उपस्थित केली नाही.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनी बैठकीस उपस्थित राहणेचे असून प्रतिनिधी पाठवू नयेत तसेच बैठकीस उपस्थित राहता येणे शक्य नसल्यास अध्यक्ष यांची पुर्वपरवानगी घेणेची आहे अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

उपस्थितांचे आभार व्यक्त करुन बैठक समाप्त झालेचे जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

(एम. देवेंदर सिंह)
अध्यक्ष, सागरी किनारा व्यवस्थापन समिती, रत्नागिरी
तथा जिल्हाधिकारी रत्नागिरी

क्र. महसूल/कार्या/अे.के. ६/DCZMA/०२/२०२४
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - ०५/०३/२०२४

प्रतिलिपी - १. सर्व संबंधित सदस्य यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
२. अनौपचारिक संदर्भाने महसूल सहाय्यक-४ (L४) यांजकडे माहिती व कार्यवाहीसाठी.

**दिनांक २२/०३/२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष/वेबेक्स व्ही.सी. द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी | अध्यक्ष |
| २. | प्रतिनिधी जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| ३. | जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ४. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ५. | सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ६. | प्रतिनिधी सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| ७. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| ९. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| १०. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| ११. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| १२. | प्रतिनिधी मुख्याधिकारी, नगर परिषद रत्नागिरी | सदस्य |
| १३. | प्रतिनिधी मुख्याधिकारी, नगर पंचायत गुहागर | सदस्य |
| १४. | श्री. विठ्ठल भालेकर, रा. वेलदूर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी | सदस्य |
| १५. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य |

---

सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## 1. Implementation of Coastal Zone Management Plans (CZMP) under provisions of the CRZ Notification, 2019

मा. एमसीझेडएम, मुंबई यांनी दिनांक 20/10/2023 रोजीच्या पत्रान्वये रत्नागिरी जिल्हयांचे प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे हे केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयामार्फत मंजूर करण्यात आलेबाबत या कार्यालयास कळविले आहे. सदर बाबत संबंधितांना या कार्यालयाकडील दिनांक 24/01/2024 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.

तथापि, उक्त दिनांक 20/10/2023 रोजीच्या परिपत्रकाद्वारे स्वयंस्पष्ट निर्देश देण्यात आलेले असतानाही, विकास आराखडयामध्ये सीआरझेडची रेषा पुर्वीच्या मंजूर सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (Approved CZMP) 1991 नुसार दर्शविण्यात आलेली असल्यामुळे संबंधित नियोजन प्राधिकरणाद्वारे प्रकल्प प्रवर्तकाकडुन सीआरझेड च्या स्थितीबाबत मा. MCZMA, मुंबई यांचे अभिप्राय मागविले जातात तसेच विकास आराखडयामध्ये सीआरझेडची रेषा मंजूर सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (Approved CZMP) 2019 नुसार अध्यारोपीत करणे क्रमप्राप्त असुन त्याप्रमाणे विकास आराखडे

अद्यावत करणे आवश्यक असलेबाबत मा. पर्यावरण विभाग, मंबई यांनी दिनांक 26/02/2024 रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत.

विकास आराखडयामध्ये सीआरझेडची रेषा मंजूर सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (Approved CZMP) 2019 नुसार अध्यारोपीत करुन त्याप्रमाणे विकास आराखडे अद्यावत करणेची कार्यवाही करणेबाबत सदस्य तथा (1) नगर रचनाकार रत्नागिरी (2) मुख्याधिकारी नगर पंचायत/परिषद यांना या कार्यालयाकडील दिनांक 06/03/2024 रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले आहेत तसेच सदस्य तथा उपविभागीय अधिकारी यांना अवगत करण्यात आले आहे.

तरी विकास आराखडयामध्ये सीआरझेडची रेषा मंजूर सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (Approved CZMP) 2019 नुसार अध्यारोपीत करुन त्याप्रमाणे विकास आराखडे अद्यावत करणेची कार्यवाही संबंधित यंत्रणांनी करावी.

## 2. Implementation of para 7(vi) of the CRZ Notificaion, 2019 regarding proposed self-dwelling units up to a total built up area of 300 square meters

सीआरझेड अधिसूचना 2019 मधील परिच्छेद क्र. 7(iv) मध्ये " 300 वर्ग मीटर पर्यंतच्या एकूण बांधीव क्षेत्रफळाच्या स्वनिवासी गाळयांना संबंधित नियोजन प्राधिकरण संबंधित किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या शिफारशी शिवाय मान्यता प्रदान करतील. मात्र मान्यता प्रदान करण्यापूर्वी सदर प्राधिकरण सादर प्रस्तावाचा किनारपट्टी नियमन क्षेत्र अधिसूचनेच्या दृष्टीकोनातून अभ्यास करेल", असे नमुद आहे.

मा. एमसीझेडएमए, मुंबई यांनी दिनांक 18/10/2023 रोजीच्या परिपत्रकान्वये दिलेल्या निर्देशान्वये संबंधित नियोजन प्राधिकरण यांनी वर नमुद सीआरझेड अधिसूचना 2019 मधील परिच्छेद क्र. 7(iv) नुसार अंमलबजावणी करावी. सदरचे परिपत्रक या कार्यालयाकडील दिनांक 24/01/2024 रोजीच्या पत्रासोबत संबंधितांना पाठविणेत आले आहे.

## 3. सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन करण्यात आलेबाबतच्या तक्रार अर्जप्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबाबत आदर्श कार्यप्रणाली (Standard Operation Procedure-SOP)

सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन करण्यात आलेबाबतच्या तक्रार अर्जप्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबाबत आदर्श कार्यप्रणाली (Standard Operating Procedure-SOP) तयार करणेत आलेली असुन त्यानुसार सीआरझेड उल्लंघनाची प्रकरणे हाताळून कार्यवाही करणेबाबत पर्यावरण विभागाकडील दिनांक 26/02/2024 रोजीच्या पत्रान्वये निर्देश प्राप्त झाले आहेत.

सदर आदर्श कार्यप्रणाली (Standard Operating Procedure-SOP) सदस्य तथा – (1) विभागीय वन अधिकारी रत्नागिरी (चिपळूण) (2) सर्व उपविभागीय अधिकारी (3) उप प्रादेशिक अधिकारी रत्नागिरी/चिपळूण (4) मुख्याधिकारी नगरपंचायत/नगर परिषद तसेच जिल्हा सह आयुक्त,नपाप्र शाखा यांना या कार्यालयाकडील दिनांक 06/03/2024 रोजीचे पत्रान्वये पाठविणेत आली आहे.

तरी सीआरझेड उल्लंघन प्रकरणी उक्त आदर्श कार्यप्रणाली (Standard Operating Procedure-SOP) मध्ये दिलेल्या निर्देशांनुसार कार्यवाही करावी.

## 4. मा. एमसीझेडएमए, मुंबई कडील प्रलंबित तक्रारींबाबत आढावा –

मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितीची बैठक दिनांक 27/07/2023 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा. एमसीझेडएमए, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या प्रलंबित तक्रारींचे अनुषंगाने आढावा घेण्यात आला.

मा. अध्यक्ष, एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून सन 2019 ते 2023 पर्यंत प्राप्त 32 तक्रारींबाबतचा विहित नमुन्यातील तपशील पुढीलप्रमाणे आहे -

| | Construction in NDZ area within CRZ area | Constructions in CRZ II/ III without CRZ permission from competent authority | Construction beyond CRZ permission | C&D waste/ Debris dumping in Mangroves & its 50 m. buffer, CRZ I | Total |
|---|---|---|---|---|---|
| **Complaint received** | 07 | 17 | 0 | 08 | 32 |
| **Action Taken** | 02 | 08<br>[01- Complaint at Sr.no. 31 is not related to CRZ] | 0 | 05 | 15 |
| **Action pending with reason** | 05<br>03-Pending at Court for hearing.<br>01-Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>01-Report received from SDO, Dapoli. But pending at this office for compliance report. | 09<br>03- Pending at Court for hearing.<br>02-Pending at Chief Office, Nagar Panchayat /Parishad.<br>03- Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>01-Report received from SDO, Dapoli. But pending at this office for compliance report | 0 | 03<br>01-Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>01-Pending at MPCB, Chiplun for report.<br>01-Pending at Grampanchayat for report | 17 |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता तक्रारींचे अनुषंगाने पुर्तता अहवाल सादर करणेवर प्रलंबित तक्रारींची संख्या 11 व मा. न्यायालयात प्रलंबित तक्रारी 6 आहेत. सदर तक्रारी या सन 2019 पासून प्रलंबित असलेमुळे अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली असलेबाबत सदस्य सचिव यांनी उपस्थित सदस्य यांना सांगितले. पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधित उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांजकडे पाठविणेत आलेल्या आहेत असे सदस्य सचिव यांनी सांगितले. तरी उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांनी अनुपालन अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेची दक्षता घ्यावी. तसेच पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई यांजकडे अनुपालन अहवाल सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.

मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यांची दरमहा बैठक आयोजित करण्यात येत असलेमुळे माहे जानेवारी 2024 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी/ मुख्याधिकारी तथा सदस्य यांना निर्देश देण्यात आले.

## 5. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

रत्नागिरी जिल्हयातील सीआरझेड क्षेत्रातील बांधकामाबाबत प्राप्त झालेल्या मा. एमसीझेडएमए, मुंबई व अन्य व्यक्तींकडील तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. —

| उपविभाग | माहे डिसेंबर 2023 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2024 ते मार्च 2024 मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 17 | 2 | 19 | 2 | 17 | 2 | 15 | 9 | 6 |
| खेड | 3 | 0 | 3 | 0 | 3 | 0 | 3 | 0 | 3 |
| चिपळूण | 9 | 1 | 10 | 1 | 9 | 3 | 6 | 4 | 2 |
| रत्नागिरी | 21 | 0 | 21 | 0 | 21 | 2 | 19 | 11 | 8 |
| राजापूर | 7 | 0 | 7 | 0 | 7 | 1 | 6 | 1 | 5 |
| | 57 | 3 | 60 | 3 | 57 | 8 | 49 | 25 | 24 |

| **उपविभाग** | **MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **एकुण तक्रारींची संख्या** |
|---|---|---|---|
| दापोली | 3 | 12 | 15 |
| खेड | 2 | 1 | 3 |
| चिपळूण | 2 | 4 | 6 |
| रत्नागिरी | 5 | 14 | 19 |
| राजापूर | 3 | 3 | 6 |
| | 15 | 34 | 49 |

आवक तक्रारी व निकाली तक्रारी यांचा मेळ घेतला असता निकाली तक्रारींची संख्या खूप कमी असलेचे सदस्य सचिव यांनी सांगितले.

| **कार्यालय** | **प्रलंबित प्रकरणांचा तपशील** | **दिलेल्या सूचना** |
|---|---|---|
| उप प्रादेशिक अधिकारी, चिपळूण | कोतवली सोनपात्रा नदीमधील पाणी प्रदुषणाबाबत फेरअहवाल सादर करणेबाबत दिनांक 29/02/2024 रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. तसेच केळशी समुद्रकिना-यावर प्लास्टीक तसेच इतर तत्सम वस्तु टाकून प्रदुषण केलेबाबतचे तक्रार प्रकरणी ग्रामपंचायत केळशी यांना लेखी पत्र देणेत आले आहे. | मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त तक्रार अर्ज व त्यानुषंगाने केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करुन अर्जदार यांचे अर्जप्रकरणी योग्य ती कार्यवाही झालेली असल्यास अर्ज निकाली ठेवणेत यावा अगर कसे? याबाबत स्वयंस्पष्ट अभिप्रायासह फेरअहवाल तक्रार अर्ज व आवश्यक कागदपत्रांसह या कार्यालयाकडे तात्काळ सादर करावा. तसेच ग्रामपंचायत केळशी यांना दिनांक 29/02/2024 रोजीच्या पत्रान्वये करण्यात आलेल्या कार्यवाहीचा पुर्तता अहवाल सादर करणेबाबत कळविणेत आले आहे. तथापि उप प्रादेशिक अधिकारी यांनी पाठपुरावा करुन ग्रामपंचायतीकडील अहवाल त्यांचेमार्फत या कार्यालयास सादर करावा. |

| | | |
|---|---|---|
| उपविभागीय अधिकारी दापोली | 3 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 1 प्रकरणामध्ये तहसीलदार यांचेमार्फत विनामुल्य मोजणी करणेबाबत भूमी अभिलेख कार्यालयास निर्देश देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला आहे. 9 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. 1 प्रकरण प्रदुषण विभागाकडील आहे.1 प्रकरणामध्ये दावा दाखल करणेवर प्रलंबित आहे. | न्यायालयीन स्तरावरील प्रकरणांची सदयस्थिती पुढील बैठकीपुर्वी अदयावत करावी. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |
| उपविभागीय अधिकारी चिपळूण | 1 प्रकरणांमध्ये पर्यावरण संरक्षण कायदा 1986 च्या कलम 5 अंतर्गत नोटीस देणेत आलेली आहे. 4 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. 1 प्रकरण मुख्याधिकारी, न.पं. गुहागर यांजकडे अहवालासाठी प्रलंबित आहेत. तसेच 1 प्रकरणामध्ये अहवाल सादर करण्यात आला आहे. | न्यायालयीन स्तरावरील प्रकरणांची सदयस्थिती पुढील बैठकीपुर्वी अदयावत करावी. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |
| उपविभागीय अधिकारी राजापूर | 1 प्रकरणांमध्ये तहसीलदार राजापूर यांचा अहवाल प्राप्त झाला आहे. 2 प्रकरणांमध्ये मोजणीसाठी भुमी अभिलेख स्तरावर प्रलंबित असून पोलीस संरक्षणामध्ये मोजणीची कार्यवाही पुर्ण करणेत येणार आहे. 1 प्रकरणांमध्ये मोजणीची कार्यवाही पुर्ण झालेली असुन मोजणी नकाशा प्राप्त होणेवर प्रलंबित आहे. 1 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. तसेच 1 प्रकरणामध्ये मोजणी होणेची आहे. | भुमी अभिलेख कार्यालयाशी बैठक आयोजित करुन मोजणी पूर्ण करणेबाबत वारंवार सूचना देण्यात आलेल्या असतानाही मोजणीची कार्यवाही प्रलंबित राहणेबाबतची कारणे सदयस्थितीसह या कार्यालयाकडे सादर करावीत. तसेच भुमी अभिलेख कार्यालयाशी बैठक आयोजित करुन मोजणीबाबत कार्यवाही पुढील बैठकीपुर्वी पुर्ण करुन घ्यावी. |
| उपविभागीय अधिकारी खेड | 1 प्रकरणांमध्ये मोजणीसाठी भुमी अभिलेख स्तरावर प्रलंबित आहे सदर कामी पोलीस संरक्षणामध्ये मोजणीची कार्यवाही पुर्ण करणेत येणार आहे. 1 प्रकरण मुख्याधिकारी यांचे स्तरावरील व 1 प्रकरण प्रदुषण विभागाकडील आहे. | भुमी अभिलेख कार्यालयाशी बैठक आयोजित करुन मोजणी पूर्ण करणेबाबत वारंवार सूचना देण्यात आलेल्या असतानाही मोजणीची कार्यवाही प्रलंबित राहणेबाबतची कारणे सदयस्थितीसह या कार्यालयाकडे सादर करावीत. मुख्याधिकारी/ प्रदुषण विभाग यांचे स्तरावरील प्रकरणांमध्ये पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |
| उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | 2 प्रकरणांमध्ये बांधकाम निष्कासनाची नोटीस व आदेश देण्यात आले आहेत. 6 प्रकरणांमध्ये चौकशीची कार्यवाही सुरु आहे. 1 प्रकरणांमध्ये मोजणीसाठी भुमी अभिलेख स्तरावर प्रलंबित आहे. 10 प्रकरणे न्यायालयीन स्तरावर प्रलंबित आहेत. | न्यायालयीन स्तरावरील प्रकरणांची सदयस्थिती पुढील बैठकीपुर्वी अदयावत करावी. तसेच अन्य विभागांकडे पाठपुरावा करुन अनुपालन अहवाल सादर होईल याकडे लक्ष दयावे. |

तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

उपविभागीय अधिकारी खेड व राजापूर यांचे स्तरावरील मोजणीचे प्रकरण बराच कालावधीपासून प्रलंबित आहे, तरी भूमी अभिलेख विभागाची बैठक आयोजित करुन मोजणीची कार्यवाही प्राधान्याने पुर्ण होईल याकडे लक्ष पुरवावे अश्या सुचना

अध्यक्ष यांनी दिल्या. तसेच मुख्याधिकारी स्तरावरील प्रलंबित प्रकरणांमध्ये जिल्हा सह आयुक्त, नपाप्र, रत्नागिरी यांनी विशेष लक्ष दयावे अश्या सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींचे अध्यक्ष यांची दरमहा बैठक आयोजित करण्यात येत असलेमुळे माहे जानेवारी 2024 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व संबंधितांना निर्देश देण्यात आले.

## 6. Status of violation cases and action taken on violation cases by States/Union Territories as per CRZ Notifications, 2011/2019

मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडील दिनांक 15/06/2023 रोजीच्या पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रामध्ये सीआरझेड तरतूदींचे उल्लंघन करुन करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे, त्यांची सदयस्थिती व त्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करणेचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत अनधिकृत बांधकामाबाबतची यादी प्राप्त झाली आहे. सदर यादी नुसार रत्नागिरी जिल्हयातील सीआझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची एकुण संख्या 1029 असुन उपविभाग निहाय गोषवारा पुढीलप्रमाणे आहे -

**सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत माहिती**

| उपविभागाचे नांव | सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची संख्या | | | निर्गमित केलेल्या नोटिसांची संख्या | | | न्यायालयीन स्तरावर दाखल प्रकरणे | | | स्थगिती आदेश मिळालेली प्रकरणे | | | निष्कासनाचे आदेश पारीत संख्या | | | निष्कासनाची कार्यवाही केलेली संख्या | | | पर्यावरण कायदयांतर्गत गु दाखल केलेली संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III |
| दापोली | 4 | 0 | 191 | 4 | 0 | 191 | 0 | 0 | 45 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 7 |
| मंडणगड | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 4 | 0 | 192 | 4 | 0 | 192 | 0 | 0 | 45 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 7 |
| खेड | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| चिपळूण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| गुहागर | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 10 |
| **एकुण** | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 177 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 10 |
| रत्नागिरी | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| संगमेश्वर | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 0 | 0 | 145 | 0 | 0 | 145 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| राजापूर | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 494 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| लांजा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 494 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **जिल्हयाची एकुण** | 4 | 11 | 1014 | 4 | 11 | 1008 | 0 | 0 | 90 | 0 | 0 | 25 | 0 | 0 | 13 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 19 |

➢ उपविभाग राजापूर : राजापूर तालुक्यातील 500 प्रकरणांपैकी 494 प्रकरणांमध्ये नोटिसा देण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित 6 प्रकरणांमध्ये तहसीलदार राजापूर यांचेमार्फत अहवाल अप्राप्त आहे. सदर अहवाल प्राप्त होईल याबाबत पाठपुरावा करणेत येत आहे. सदर अहवाल झालेनंतर नोटीसा देण्याचे काम प्राधान्याने पुर्ण करणेत येईल असे उपविभागीय अधिकारी राजापूर यांनी सांगितले.

**7. मौजे अंजनवेल, ता. गुहागर येथे कोकण एल.एन.जी. प्रा.लि. कंपनीसाठीच्या ब्रेक वॉटर वॉलच्या विस्तारीकरणाच्या सुरु असलेल्या कामाबाबत -**

उक्त विषयाबाबत उपविभागीय अधिकारी, चिपळूण यांजकडील दिनांक 19/12/2023 रोजीचा अहवाल प्रादेशिक बंदर अधिकारी यांच्या दिनांक 18/12/2023 रोजीच्या अहवालासह प्राप्त झाला आहे. सदर अहवालानुसार मा. संचालक, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडे अहवाल सादर करणेत यावा असे दिनांक 29/12/2023 रोजीच्या बैठकीमध्ये ठरविणेत आले होते. मा. संचालक, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडे अहवाल सादर करणेपुर्वी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन घेवुन व सीआरझेड अधिसूचनामधील तरतूदींनुसार स्वयंस्पष्ट अहवाल तात्काळ सादर करावा असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

श्री. विठ्ठल भालेकर, सदस्य यांनी दिनांक 22/02/2024 रोजीच्या मिटींगमध्ये उक्त विषयाबाबतचा अहवाल मा. संचालक, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडे सादर करणेबाबतचे निर्देश होते तथापि अदयापपर्यंत अहवाल सादर झालेला नाही असा मुद्दा उपस्थित केला. त्यावर प्रादेशिक बंदर अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, रत्नागिरी यांना त्यांचेकडील दिनांक 18/12/2023 रोजीच्या अहवालामध्ये पर्यावरण विभागाकडील सीआरझेड परवानगी दिनांक 07/04/2020 रोजीच्या आदेशान्वये व ब्रेकवॉटर वॉलच्या बांधकामास महाराष्ट्र सागरी मंडळ यांचेकडील दिनांक 14/09/2020 रोजीच्या आदेशान्वये परवानगी प्राप्त असलेबाबत नमुद केलेवरुन सदर कागदपत्रांच्या प्रती या कार्यालयास पाठविणेबाबत दिनांक 28/02/2024 रोजीच्या पत्रान्वये कळविणेत आले असलेबाबत तहसीलदार (महसूल) यांनी सांगितले. सदर कागदपत्रे प्रादेशिक बंदर अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, रत्नागिरी यांजकडून प्राप्त झालेनंतर सीआरझेड अधिसूचनामधील तरतूदींनुसार स्वयंस्पष्ट अहवाल मा. संचालक, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडे तात्काळ सादर करावा असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले. अन्यथा पुढील बैठकीमध्ये प्रादेशिक बंदर अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, रत्नागिरी यांना उपस्थित राहणेबाबत लेखी कळविणेत यावे अश्या सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

**8. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने आयोजित जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठकीमध्ये समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

**a) कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 संदर्भात अन्य न्यायालयाकडील आदेश अथवा मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 चा अंतीम आदेश यांना अधीन राहून साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेच्या कार्यवाहीबाबत निर्णय घेणेत येईल.

**b) पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –**

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. श्री. अनिल परब व श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचे नांवे असलेल्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करणेबाबत मासिक बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते.

उक्त प्रकरणी या कार्यालयाकडील दिनांक 23/01/2024 रोजीच्या **पत्रानुषंगाने योग्य ती कार्यवाही करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना कळविणेत आले आहे. तरी पर्यावरण नुकसान भरपाईबाबत** केलेल्या **कार्यवाहीचे अनुषंगाने लेखी अहवाल सादर करावा. तसेच पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबत तहसीलदार दापोली/खेड यांचेमार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी लेखी अहवाल सादर करावा.** तसेच संबंधित संकलनास देखील इतीवृत्ताची प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविणेत येवुन त्यांचेकडुन पुढील बैठकीपुर्वी अहवाल प्राप्त करुन घ्यावा असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

**c) न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही –**

i) **मा. दिवाणी न्यायालय, खेड येथील दावा क्र.** 57/2021

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 रोजीचा आदेश -**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 चे आदेशाविरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय, खेड येथे दिवाणी किरकोळ अपील क्र. 08/2023 दाखल करणेत आले असुन सदर अपीलाची अंतीम सुनावणी दिनांक 04/11/2023 रोजी झालेली असुन अपील मान्य करणेत आले आहे.

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 04/11/2023 रोजीच्या आदेशाविरुध्द अपील -**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 04/11/2023 रोजीच्या आदेशान्वये या कार्यालयामार्फत दाखल अपील मान्य करणेत आले आहे. सदर आदेश रद्द करणेबाबत श्री. सदानंद कदम यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. 14850/2023 दाखल केली असुन दिनांक 11/12/2023 रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सदर याचिका Pre-admission वर आहे.

**सदर दावा प्रकरणी दिनांक 18/03/2024 रोजी सुनावणी आदेश पारित करण्यात आला आहे. सदर आदेशाचे अवलोकन केले असता मुद्दा क्र. 9 नुसार सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन केल्याप्रकरणी केलेल्या कारवाईबाबत मा. महाराष्ट्र शासन यांनी संबंधित योग्य उच्च अधिका-याद्वारा चार आठवडयांच्या कालावधीत प्रतिज्ञापत्र दाखल करावे असे निर्देश दिलेले आहेत.** तसेच प्रकरणी **पुढील सुनावणीची तारिख दिनांक 17/04/2024 रोजी सुनावणी आदेशाच्या अनुपालनासाठी निश्चित करण्यात आली आहे.**

मा. उच्च न्यायालयाने दिनांक 18/03/2024 रोजी पारित केलेला आदेश मा. प्रधान सचिव, पर्यावरण तथा अध्यक्ष, एमसीझेडएमए, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे पुढील योग्य त्या कायदेशीर कार्यवाहीसाठी या कार्यालयाकडील दिनांक 19/03/2024 रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आला आहे.

सीआरझेड अधिसूचनेची अंमलबजावणी ही पर्यावरण विभागामार्फत होत असलेमुळे प्रशासकीय विभाग म्हणुन उक्त प्रकरणी दिनांक 18/03/2024 रोजीचे आदेशान्वये सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन केल्याप्रकरणी केलेल्या कारवाईबाबत मा. महाराष्ट्र शासन तर्फे संबंधित योग्य उच्च अधिकाऱ्याद्वारा चार आठवड्यांच्या कालावधीत प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी दिनांक 27/03/2024 पर्यंत सहाय्यक सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुंबई यांजकडे संपर्क साधणेबाबत मा. प्रधान सचिव, पर्यावरण तथा अध्यक्ष, एमसीझेडएमए, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना कळविणेबाबत मा. अपर मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांना या कार्यालयाकडील दिनांक 20/03/2024 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे.

**उक्त प्रकरणी दिनांक 18/03/2024 रोजीचे आदेशान्वये सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन केल्याप्रकरणी सीआरझेड अधिसूचना लागू झाल्यापासुन (सन 1991) केलेल्या कारवाईबाबतचा (बांधकाम**

**निष्कासन करण्यात आले असल्यास त्याची यादी स्वतंत्र जोडावी) अहवाल सर्व उपविभागीय अधिकारी तथा सदस्य, DCZMA यांनी दिनांक 26/03/2024 रोजी पर्यंत सादर करावा. तद्नंतर जिल्हयाचा एकत्रीत अहवाल मा. शासनास सादर करणेची कार्यवाही करावी, असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले**

प्रस्तुत दावा प्रकरणी सुनावणीची पुढील तारीख दिनांक 17/04/2024 रोजी ठेवण्यात आली आहे.

- **निशाणी-33 वरील अपीलबाबत** -

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांजकडील निशाण 33 वरील दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द फेरतपासणी अपील क्र. Writ Petition WPST 26447/2023 उपविभागीय अधिकारी दापोली यांनी दिनांक 26/09/2023 रोजी दाखल केले आहे. सदर रिट याचिका Pre-admission वर आहे.

- **हस्तांतरण अर्जाबाबत (Transfer Application)** -

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दावा क्र. रेमुनं. 57/2021 दाखल आहे. सदर दावा हस्तांतरीत करणेबाबत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात Civil M.A. 11/2023 अन्वये हस्तांतरण अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी श्री. सदानंद गंगाराम कदम तर्फे ॲड. नेने हजर झाले आहेत. प्रस्तुत अर्ज प्रकरणी अर्जदाराच्या युक्तीवादावर प्रलंबित आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 28/03/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

- **पुढील सुनावणी** –

रेमुनं. 57/2021 दाव्यामध्ये वादीने निशाणी 62 वर म्हणणे देणेसाठी, साक्षयादी देणेसाठी दिनांक 09/02/2024 रोजीची तारखी निश्चित करण्यात आली होती. तथापी सदर दावा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका 14850/2023 मधील पुढील आदेशास अधीन राहुन पुढील सुनावणीची तारीख दिनांक 05/04/2024 रोजी पर्यंत स्थगित करण्यात आला आहे.

### ii) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथील अर्ज क्र. 58/2021

श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 02/05/2023 रोजी झाली असुन सदर दावा फेटाळून लावणेत (Dismissed) आला आहे.

### iii) मा. दिवाणी न्यायालय,खेड येथील दावा क्र. 12/2022

मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड यांचे न्यायालयात 1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19 व 15 चे 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील क्रिमीनल रिव्हीजन अर्ज क्र. 11/2022 प्रलंबित असुन सदर अर्जावरील न्यायनिर्णय होईपर्यंत उक्त दावा अर्ज 12/2022 स्थगितीवर ठेवण्यात आलेला आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 23/04/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

iv) **मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील दावा क्र. 11125/2022**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक 25/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11125/2022 दाखल केले आहे.

सदर दाव्यामध्ये अतिरिक्त मुद्दयांच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र आणि Interim Application उपविभागीय अधिकारी दापोली यांचेमार्फत दिनांक 04/10/2023 रोजी दाखल करणेत आले आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 22/02/2024 रोजी निश्चित करण्यात आली होती. सदर दावा **PRE-ADMISSION** वर असुन पुढील सुनावणीची तारीख निश्चित करण्यात आलेली नाही.

## 9. मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएकस/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत - डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर केलेले अतिक्रमण म.ज.म.अ.1966 चे कलम 50(3) व कलम 53 नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 च्या बाहेरील अतिक्रमण करण्यात आलेली शासकीय जमीन ही गाळाने तयार झालेली किना-यालगतची जमीन (Foreshore Land) आहे. सबब सीआझेड तरतूदींचे अनुषंगाने प्रशासकीय विभाग म्हणुन पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे? याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव मा. संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे त्यांचे अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तथापि अदयाप पर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

## 10. तत्कालीन मंडळ अधिकारी, मुरुड यांचेविरुध्द करण्यात आलेली कारवाई –

मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांजकडील दिनांक २४/०३/२०२३ रोजीचे पत्रान्वये पोलीस निरीक्षक, दापोली पोलीस ठाणे यांजकडील दिनांक २०/०३/२०२३ रोजीचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालाचे अवलोकन केले असता, पोलीस ठाणे दापोली यांचे येथे दाखल गुन्हा रजि. नं. १७७/२०२३ मध्ये श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांना आरोपी करण्यात आले असुन त्यांना दिनांक १५/०३/२०२३ रोजी अटक करण्यात आली होती. श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांची मा. न्यायालयाने दिनांक २०/०३/२०२३ रोजी जामीनावर मुक्तता केलेली आहे. श्री. पारदुले यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

## प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना –

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.

२. मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करावी.
३. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणांची सदयस्थिती सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले. तसेच तपशिलामध्ये दाव्याची सुनावणीची पुढील तारीख व पुढील तारखेचे कारण नमुद करण्यात यावे.
४. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.
५. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.
६. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.
७. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत तथापी बराच काळ प्रलंबित आहेत, अशा प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित विभागाची बैठक आयोजित करुन व पाठपुरावा करुन अहवाल प्राप्त होतील याकडे लक्ष पुरवावे.
८. अभिप्राय अपेक्षिलेल्या प्रकरणांमध्ये वेळोवेळी संबंधित विभागास स्मरणपत्र काढणेची कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

## सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना —

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.
२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.
४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.
५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.
८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

## सर्वसाधारण सूचना

- सागरी किनारा व्यवस्थापन समिती, रत्नागिरी (DCZMA) च्या दरमहा आयोजित करण्यात येणा-या बैठकीचे लेखी पत्र तसेच इतिवृत्त या कार्यालयाच्या अधिकृत ई-मेल द्वारे पाठविणेत येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता श्री. विठ्ठल भालेकर, मच्छिमार प्रतिनिधी सदस्य यांनी बैठकीच्या अनुषंगाने मुद्दा उपस्थित केला तो असा की, सागरी किनारा व्यवस्थापन समितीची बैठक कोरोना काळापासून व्हिडीओ कॉन्फरंसींगद्वारे (V.C. द्वारे) घेण्यात येत असुन किमान ३ महातुन एकदा तरी बैठक व्हिडीओ कॉन्फरंसींगद्वारे (V.C. द्वारे) न घेता व्यक्तीश: आयोजित करावी तसेच अशासकीय सदस्यांना बैठकीसाठी जाणे-येणेचा भत्ता आदा करणेत यावा. त्यावर सागरी किनारा व्यवस्थापन समितीची बैठक आयोजित करणेपुर्वी अन्य

बैठकींचे नियोजन पाहुन उपलब्ध वेळेनुसार सागरी किनारा व्यवस्थापन समितीची बैठक किमान ३ महातुन एकदा व्यक्तीश: आयोजित करणेबाबत निश्चित विचार करण्यात येईल असे सदस्य सचिव यांनी सांगितले. तसेच बैठक भत्ता आदा करणेबाबत मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करण्यात आली असल्यास सदर बाबत मा. संचालक पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विचारणा करणेत येईल व तत्पश्चात बैठक भत्त्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे सदस्य सचिव यांनी सांगितले.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनी बैठकीस उपस्थित राहणेचे असून प्रतिनिधी पाठवू नयेत तसेच बैठकीस उपस्थित राहता येणे शक्य नसल्यास अध्यक्ष यांची पुर्वपरवानगी घेणेची आहे अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

उपस्थितांचे आभार व्यक्त करुन बैठक समाप्त झालेचे जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी**
**यांच्या स्वाक्षरीची.**

(चंद्रकांत सुर्यवंशी)
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी

क्र. महसूल/कार्या/अ.के. ६/DCZMA/०३/२०२४
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - ०७/०६/२०२४

प्रतिलिपी - १. सर्व संबंधित सदस्य यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
२. अनौपचारिक संदर्भाने महसूल सहाय्यक-४ (L४) यांजकडे माहिती व कार्यवाहीसाठी.

**दिनांक २९/०८/२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष तसेच दुरभाष्य प्रणाली (व्ही.सी.) द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी | अध्यक्ष |
| २. | जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी | सदस्य |
| ३. | प्रतिनिधी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ४. | विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ५. | प्रतिनिधी सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ६. | प्रतिनिधी सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| ७. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| ९. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| १०. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| ११. | प्रतिनिधी उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| १२. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| १३. | मुख्याधिकारी, नगर परिषद रत्नागिरी | सदस्य |
| १४. | डॉ. ए.सी.ठाकूरदेसाई, प्राचार्य, गोगटे जोगळेकर कॉलेज रत्नागिरी | सदस्य |
| १५. | श्री. विठ्ठल भालेकर, रा. वेलदूर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी | सदस्य |
| १६. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य |

तसेच वरील समिती सदस्यां व्यतिरीक्त जिल्हा खनिकर्म अधिकारी, रत्नागिरी यांना बैठकीस उपस्थित रहाणेबाबत तोंडी कळविणेत आलेमुळे जिल्हा खनिकर्म अधिकारी, रत्नागिरी हे बैठकीस प्रत्यक्ष उपस्थित राहिलेले आहेत.

---

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची आचारसंहिता असल्यामुळे माहे मार्च २०२४ नंतर माहे ऑगस्ट २०२४ मध्ये माहे जुलै २०२४ व माहे ऑगस्ट २०२४ या महाची एकत्रित जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीची मासिक बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. सदर बैठकीसाठी उपस्थित असलेल्या सदस्यांचे सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

1. **<u>मा. एमसीझेडएमए, मुंबई कडील प्रलंबित तक्रारींबाबत आढावा –</u>**

मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींच्या अध्यक्षांची बैठक दरमहा आयोजित करण्यात येते. सदर बैठकीमध्ये मा. एमसीझेडएमए, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन करण्यात आलेल्या बांधकामांच्या तक्रारींचे अनुषंगाने आढावा घेण्यात येत आहे.

मा. अध्यक्ष, एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून सन 2019 ते 2023 पर्यंत प्राप्त 32 तक्रारींबाबतचा विहित नमुन्यातील तपशील पुढीलप्रमाणे आहे -

| | Construction in NDZ area within CRZ area | Constructions in CRZ II/ III without CRZ permission from competent authority | Construction beyond CRZ permission | C&D waste/ Debris dumping in Mangroves & its 50 m. buffer, CRZ I | Total |
|---|---|---|---|---|---|
| **Complaint received** | 07 | 17 | 0 | 08 | 32 |
| **Action Taken** | 02 | 09 | 0 | 07 | 18 |
| **Action pending with reason** | 05<br>03-Pending at Court for hearing.<br>01-Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>01-Report received from SDO, Dapoli. But pending at this office for compliance report. | 08<br>03- Pending at Court for hearing.<br>02-Pending at Chief Office, Nagar Panchayat /Parishad.<br>02- Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>01-Report received from SDO, Dapoli. But pending at this office for compliance report | 0 | 01<br>01-Pending at Grampanchayat for report | 14 |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता तक्रारींचे अनुषंगाने पुर्तता अहवाल सादर करणेवर प्रलंबित तक्रारींची संख्या 8 व मा. न्यायालयात प्रलंबित तक्रारी 6 आहेत. सदर तक्रारी या सन 2019 पासून प्रलंबित असलेमुळे अध्यक्षांनी नाराजी व्यक्त केली. पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधित उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांजकडे पाठविणेत आलेल्या आहेत असे सदस्य सचिव यांनी सांगितले. तरी उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांनी अनुपालन अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेची दक्षता घ्यावी तसेच पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई यांजकडे अनुपालन अहवाल सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे अध्यक्षांनी सांगितले.

मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींचे अध्यक्ष यांची दरमहा बैठक आयोजित करण्यात येत असलेमुळे माहे जानेवारी 2024 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी/ मुख्याधिकारी तथा सदस्य यांना अध्यक्षांनी निर्देश दिले.

तसेच सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन करण्यात आलेबाबतच्या तक्रार अर्जप्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबाबत पर्यावरण विभागाकडील आदर्श कार्यप्रणाली (Standard Operating Procedure-SOP) नुसार सीआरझेड उल्लंघनाची प्रकरणे हाताळून कार्यवाही करणेबाबत सर्व संबंधितांना अध्यक्षांनी पुन:श्च निर्देश दिले.

## 2. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

रत्नागिरी जिल्हयातील सीआरझेड क्षेत्रातील बांधकामाबाबत प्राप्त झालेल्या मा. एमसीझेडएमए, मुंबई व अन्य व्यक्तींकडील तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. –

| उपविभाग | माहे डिसेंबर 2023 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2024 ते ऑगस्ट 2024 मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 17 | 2 | 19 | 2 | 17 | 2 | 15 | 9 | 6 |
| खेड | 3 | 0 | 3 | 1 | 2 | 0 | 2 | 0 | 2 |
| चिपळूण | 9 | 1 | 10 | 3 | 7 | 1 | 6 | 4 | 2 |
| रत्नागिरी | 21 | 2 | 23 | 0 | 23 | 2 | 21 | 11 | 10 |
| राजापूर | 7 | 0 | 7 | 1 | 6 | 1 | 5 | 1 | 4 |
| | 57 | 5 | 62 | 7 | 55 | 6 | 49 | 25 | 24 |

| **उपविभाग** | **MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **एकुण तक्रारींची संख्या** |
|---|---|---|---|
| दापोली | 3 | 12 | 15 |
| खेड | 1 | 1 | 2 |
| चिपळूण | 2 | 4 | 6 |
| रत्नागिरी | 5 | 16 | 21 |
| राजापूर | 2 | 3 | 5 |
| | 13 | 36 | 49 |

आवक तक्रारी व निकाली तक्रारी यांचा मेळ घेतला असता निकाली तक्रारींची संख्या खूप कमी असलेचे अध्यक्ष यांनी सांगितले. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 चे कामकाजामुळे तक्रार अर्ज प्रकरणी समाधानकारक कार्यवाही करता आलेली नाही. तथापि, माहे मार्च 2024 ते ऑगस्ट 2024 मध्ये 04 तक्रारी निकाली करण्यात आलेबाबत सदस्य सचिव यांनी अध्यक्षांचे निदर्शनास आणले.

प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करता येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

उपविभागीय अधिकारी खेड व राजापूर यांचे स्तरावरील मोजणीचे प्रकरण बराच कालावधीपासून प्रलंबित आहेत. तरी भूमी अभिलेख विभागाची बैठक आयोजित करुन मोजणीची कार्यवाही प्राधान्याने पुर्ण होईल याकडे लक्ष पुरवावे अश्या सुचना अध्यक्ष यांनी दिल्या. तसेच मुख्याधिकारी स्तरावरील प्रलंबित प्रकरणांमध्ये जिल्हा सह आयुक्त, नपाप्र, रत्नागिरी यांनी विशेष लक्ष दयावे अश्या सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींचे अध्यक्ष यांची दरमहा बैठक आयोजित करण्यात येत असलेमुळे माहे जानेवारी 2024 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच

मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व संबंधितांना सदस्य सचिव यांनी सूचना दिल्या.

## 3. Status of violation cases and action taken on violation cases by States/Union Territories as per CRZ Notifications, 2011/2019

मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडील दिनांक 15/06/2023 रोजीच्या पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रामध्ये सीआरझेड तरतूदींचे उल्लंघन करुन करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे, त्यांची सदयस्थिती व त्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करणेचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत अनधिकृत बांधकामाबाबतची यादी प्राप्त झाली असून अनधिकृत बांधकामे व निर्गमित केलेल्या नोटीसांबाबतचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे -

**सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत माहिती**

| पविभागाचे नांव | सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची संख्या | | | निर्गमित केलेल्या नोटिसांची संख्या | | | न्यायालयीन स्तरावर दाखल प्रकरणे | | | स्थगिती आदेश मिळालेली प्रकरणे | | | निष्कासनाचे आदेश पारीत संख्या | | | निष्कासनाची कार्यवाही केलेली संख्या | | | पर्यावरण कायदयांतर्गत दाखल केलेल संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II |
| दापोली | 4 | 0 | 192 | 4 | 0 | 192 | 0 | 0 | 45 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 |
| मंडणगड | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 4 | 0 | 193 | 4 | 0 | 193 | 0 | 0 | 45 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 |
| खेड | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| चिपळूण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| गूहागर | 0 | 0 | 179 | 0 | 0 | 179 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 2 | 0 | 0 |
| **एकुण** | 0 | 0 | 179 | 0 | 0 | 179 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| रत्नागिरी | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| संगमेश्वर | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 0 | 0 | 145 | 0 | 0 | 145 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| राजापूर | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 494 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| लांजा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 494 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **जिल्हयाची एकुण** | 4 | 11 | 1017 | 4 | 11 | 1011 | 0 | 0 | 90 | 0 | 0 | 25 | 0 | 0 | 13 | 0 | 0 | 3 | 0 | 0 |

- उपविभाग राजापूर : राजापूर तालुक्यातील 500 प्रकरणांपैकी 494 प्रकरणांमध्ये नोटिसा देण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित 6 प्रकरणांमध्ये तहसीलदार राजापूर यांचेमार्फत अहवाल तात्काळ प्राप्त करुन घेवुन नोटिसा बजावणीचे कामकाज पुर्ण करणेबाबत उपविभागीय अधिकारी राजापूर यांना अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

## 4. मौजे अंजनवेल, ता. गुहागर येथे कोकण एल.एन.जी. प्रा.लि. कंपनीसाठीच्या ब्रेक वॉटर वॉलच्या विस्तारीकरणाच्या सुरु असलेल्या कामाबाबत -

मौजे अंजनवेल, ता. गुहागर येथे कोकण एल.एन.जी. प्रा.लि. कंपनीसाठीच्या ब्रेक वॉटर वॉलच्या विस्तारीकरणाचे काम सुरु असलेबाबत श्री. विठ्ठल (बावा) विष्णू भालेकर, मु.पो. वेलदूर, ता. गुहागर, जि. रत्नागिरी यांच्या दिनांक 11/10/2022

रोजीच्या तक्रारी अर्जाचे अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, चिपळूण यांजकडील दिनांक 19/12/2023 रोजीचा अहवाल प्रादेशिक बंदर अधिकारी यांच्या दिनांक 18/12/2023 रोजीच्या अहवालासह प्राप्त झाला आहे.

सीआरझेड अधिसूचनामधील तरतूदींनुसार या कार्यालयाकडील अहवाल मा. संचालक, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडे या कार्यालयाकडील दिनांक 19/07/2024 रोजीचे पत्रान्वये सादर करणेत आला असलेबाबत सदस्य सचिव यांनी समितीचे निदर्शनास आणले.

**5. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने आयोजित जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठकीमध्ये समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

**a) कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 संदर्भात अन्य न्यायालयाकडील आदेश अथवा मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 चा अंतीम आदेश यांना अधीन राहून साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेच्या कार्यवाहीबाबत निर्णय घेणेत येईल.

**b) पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –**

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. श्री. अनिल परब व श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचे नांवे असलेल्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करणेबाबत मासिक बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते.

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांजकडील दिनांक 05/04/2024 रोजीचे पत्र या कार्यालयाकडे प्राप्त झाले असून श्री. अनिल परब यांचे नांवे स्थावर जमीन मालमत्ता दाखल असल्याचे दिसून येत नाही असा अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. तसेच श्री. पुष्कर मुळये यांचे जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेणेबाबत तहसीलदार मंडणगड यांना लेखी पत्र दिलेले असुन अदयापपर्यंत अहवाल प्राप्त झाले नसलेबाबत नमुद आहे. तरी तहसीलदार यांना योग्य ती कार्यवाही करणेबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी दापोली यांनी सूचना दयाव्यात असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

c) न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही —

i) मा. दिवाणी न्यायालय, खेड येथील दावा क्र. 57/2021

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 रोजीचा आदेश -**

मा. दिवाणी न्यायालय, ख़ेड यांजकडील दिनांक 17/03/2023 चे आदेशाविरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय, खेड येथे दिवाणी किरकोळ अपील क्र. 08/2023 दाखल करणेत आले असुन सदर अपीलाची अंतीम सुनावणी दिनांक 04/11/2023 रोजी झालेली असुन अपील मान्य करणेत आले आहे.

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 04/11/2023 रोजीच्या आदेशाविरुध्द अपील -**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 04/11/2023 रोजीच्या आदेशान्वये या कार्यालयामार्फत दाखल अपील मान्य करणेत आले आहे. सदर आदेश रद्द करणेबाबत श्री. सदानंद कदम यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. 14850/2023 दाखल केली असुन दिनांक 11/12/2023 रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सदर याचिका Pre-admission वर आहे.

**सदर दावा प्रकरणी सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन केल्याप्रकरणी केलेल्या कारवाईबाबतचा अहवाल मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांजकडे दिनांक 24/04/2024 रोजीच्या पत्रान्वये सादर करणेत आला आहे.**

सदर रिट याचिका क्र. 14850/2023 चे प्रकरणी दिनांक 14/06/2024 रोजीचे अंतीम सुनावणी आदेशान्वये आदेशातील अटींना अधीन राहून रिट याचिका निकाली ठेवणेत आली आहे. दिनांक 14/06/2024 रोजीचे सुनावणी आदेशातील मुद्दा क्रमांक 16 व 17 चे अवलोकन केले असता वादी यांनी हमीपत्र दिलेचे अनुषंगाने दिनांक 31/07/2024 रोजी पर्यंत रिट याचिका क्र. 11125/2022 मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेमार्फत रिसॉर्टच्या संरचनेचे संरक्षण करण्याचा याचिकाकर्त्याला कोणताही दिलासा न मिळाल्यास अथवा कोणतेही संरक्षणात्मक आदेश पारित न झालेस रिसॉर्टची संपूर्ण रचना 31 ऑगस्ट 2024 रोजी किंवा त्यापूर्वी पाडण्यात येईल, असा आदेश पारित झालेला आहे.

तथापि, वादी यांच्या वकीलांनी दिनांक 31/07/2024 रोजी कायदेशीर कागदपत्र दाखल करुन असे म्हटले आहे की, मा. उच्च न्यायालयाने (in Writ Petiton No. 11125/2022) दिनांक 10 जुलै २०२४ रोजीच्या सुनावणी आदेशान्वये हे प्रकरण कोणत्याही खंडपीठासमोर ठेवू नये ज्याचे न्यायमूर्ती अमित बोरकर सदस्य आहेत, असा आदेश केला आहे. त्यानुसार हे प्रकरण पर्यायी खंडपीठापुढे सूचीबद्ध करण्यात आले आणि हे प्रकरण पोहोचू न शकल्याने मा. उच्च न्यायालयाने (in Writ Petiton No. 14850/2023) याचिकाकर्त्याला/वादीला या रिट याचिकेत मुदतवाढ मागण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

त्यानुसार प्रस्तुत दावा प्रकरणी सुनावणीची पुढील तारीख दिनांक 09/09/2024 रोजी ठेवण्यात आली आहे.

- **निशाणी-33 वरील अपीलबाबत -**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांजकडील निशाण 33 वरील दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द फेरतपासणी अपील क्र. Writ Petition WPST 26447/2023 उपविभागीय अधिकारी दापोली यांनी दिनांक 26/09/2023 रोजी दाखल केले आहे. सदर रिट याचिका Pre-admission वर आहे.

- **हस्तांतरण अर्जाबाबत (Transfer Application) -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दावा क्र. रेमुनं. 57/2021 दाखल आहे. सदर दावा हस्तांतरीत करणेबाबत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात Civil M.A. 11/2023 अन्वये हस्तांतरण अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी श्री. सदानंद गंगाराम कदम तर्फे ॲड. नेने हजर झाले आहेत. प्रस्तुत अर्ज प्रकरणी अर्जदाराच्या युक्तीवादावर प्रलंबित आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 29/08/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

- **पुढील सुनावणी –**

रेमुनं. 57/2021 दाव्यामध्ये वादीने निशाणी 62 वर म्हणणे देणेसाठी, साक्षयादी देणेसाठी दिनांक 09/02/2024 रोजीची तारखी निश्चित करण्यात आली होती. तथापी सदर दावा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका 14850/2023 मधील पुढील आदेशास अधीन राहुन पुढील सुनावणीची तारीख दिनांक 25/10/2024 रोजी पर्यंत स्थगित करण्यात आला आहे.

**ii) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथील अर्ज क्र.** 58/2021

श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 02/05/2023 रोजी झाली असुन सदर दावा फेटाळून लावणेत (Dismissed) आला आहे.

**iii) मा. दिवाणी न्यायालय,खेड येथील दावा क्र.** 12/2022

मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, खेड यांचे न्यायालयात 1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19 व 15 चे 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील क्रिमीनल रिव्हीजन अर्ज क्र. 11/2022 प्रलंबित असुन सदर अर्जावरील न्यायनिर्णय होईपर्यंत उक्त दावा अर्ज 12/2022 स्थगितीवर ठेवण्यात आलेला आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 10/09/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

**iv) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील दावा क्र.** 11125/2022

मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक 25/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11125/2022 दाखल केले आहे.

सदर दाव्यामध्ये अतिरिक्त मुद्दयांच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र आणि Interim Application उपविभागीय अधिकारी दापोली यांचेमार्फत दिनांक 04/10/2023 रोजी दाखल करणेत आले आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 03/10/2024 रोजी निश्चित करण्यात आली असून सदर दावा **PRE-ADMISSION** वर आहे.

**6. मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएकस/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत - डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर केलेले अतिक्रमण म.ज.म.अ.1966 चे कलम 50(3) व कलम 53 नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 च्या बाहेरील अतिक्रमण करण्यात आलेली शासकीय जमीन ही गाळाने तयार झालेली किना-यालगतची जमीन (Foreshore Land) आहे. सबब सीआझेड तरतूदींचे अनुषंगाने प्रशासकीय विभाग म्हणुन पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे? याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव मा. संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे त्यांचे अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तथापि अदयाप पर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

**7. तत्कालीन मंडळ अधिकारी, मुरुड यांचेविरुध्द करण्यात आलेली कारवाई –**

मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांजकडील दिनांक २४/०३/२०२३ रोजीचे पत्रान्वये पोलीस निरीक्षक, दापोली पोलीस ठाणे यांजकडील दिनांक २०/०३/२०२३ रोजीचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालाचे अवलोकन केले असता, पोलीस ठाणे दापोली यांचे येथे दाखल गुन्हा रजि. नं. १७७/२०२३ मध्ये श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांना आरोपी करण्यात आले असुन त्यांना दिनांक १५/०३/२०२३ रोजी अटक करण्यात आली होती. श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांची मा. न्यायालयाने दिनांक २०/०३/२०२३ रोजी जामीनावर मुक्तता केलेली आहे. श्री. पारदुले यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

**8. रत्नागिरी जिल्हयातील महाराष्ट्र सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातुन (CRZ) नौकानयन जलमार्ग जलवाहतुकीस सुकर करण्यासाठी जगबुडी नदीपात्रातील हातपाटीद्वारे वाळू/रेती उत्खनन करणेबाबत –**

जिल्हा खनिकर्म अधिकारी, रत्नागिरी यांनी उक्त विषयाबाबत समितीस प्रास्ताविक केले ते पुढील प्रमाणे – वाळू/रेती सर्वकष धोरण निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने सन २०२४-२५ या कालावधीसाठी रत्नागिरी जिल्हयातील महाराष्ट्र सागरी किनारपट्टी विनियमन क्षेत्रातून (CRZ) नौकानयन जलमार्ग जलवाहतूकीस सुकर करण्यासाठी जगबुडी नदीपात्रातील हातपाटीद्वारे वाळू/रेती उत्खनन करणेकामी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ यांचेकडून दिनांक २३/०७/२०२४ रोजीचे पत्रान्वये अनुमती प्राप्त झालेली आहे. सदर पत्रान्वये दिनांक १६/०२/२०२४ च्या सर्वकष धोरणामधील प्रकरणी क्रमांक दोन II] पर्यावरण अनुमती अ) मधील मुद्दा क्रमांक २) मध्ये नमूद केल्याप्रमाणे "विनालिलाव परवाना पद्धतीने खाडीपात्रातील वाळू गट हातपाटीद्वारे वाळू/रेती उत्खननासाठी राखीव गट" यामधून पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यक्तींना तसेच अशा व्यक्तीच्या संस्थांना वाळू/रेती उत्खननाचे परवाने देण्यासाठी पर्यावरण अनुमती घेणे आवश्यक नाही. याबाबत संबंधित जिल्हाधिकारी यांनी केंद्रीय पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिनांक 24/11/2022 रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेतील तरतुदीनुसार कार्यवाही करावी, त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी पर्यावरण विषयक कार्यवाही करावी. तरी या पत्राद्वारे हातपाटी पद्धतीने उत्खनन करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेले क्षेत्र व भौगोलिक स्थान याविषयी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली असलेली District Coastal Zone Monitoring Committee (DCZMC) यांचेद्वारे पर्यावरण विषयक परवानगी देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात यावी. असे नमुद केले आहे.

त्यानुषंगाने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ यांचेकडून दिनांक २३/०७/२०२४ रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार हातपाटी पध्दतीने उत्खनन करण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेले क्षेत्र व भौगोलिक स्थान याविषयी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हास्तरीय किनारपट्टी क्षेत्र संनियंत्रण समिती, रत्नागिरी यांचेद्वारे पर्यावरण विषयक परवानगी देण्यासंदर्भात मार्गदर्शन मिळणेबाबत तसेच सदरचा मुद्दा बैठकीमध्ये चर्चेस घेणेबाबत दिनांक ०५/०८/२०२४ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेचे जिल्हा खनिकर्म अधिकारी, रत्नागिरी यांनी अध्यक्ष व सदस्य यांना अवगत केले.

सदर विषयाबाबत समितीपुढे चर्चा करण्यात आली. महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई यांचेकडील दिनांक २३/०७/२०२४ रोजीचे पत्रान्वये हातपाटी पध्दतीने ज्या ठिकाणी उत्खनन करावयाचे आहे, त्या ठिकाणची सध्याची व निर्माण करावयाची उत्खनन खोली, उत्खननाचे परिमाण निश्चित केलेले जोडपत्र – I व गटाचे अक्षांश व रेखांश नमुद केलेले भौगोलिक स्थानाबाबतचे जोडपत्र – II प्रमाणे रत्नागिरी जिल्हयातील जगबुडी नदीमधील वाळू/रेती उत्खननासाठीचे राखीव गट यामधून पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यक्तींना तसेच अशा व्यक्तीच्या संस्थांना वाळू/रेतीचे हातपाटीद्वारे (non-mechanised manual method) उत्खनन करण्यासाठी मा. महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई यांचेकडील दिनांक २३/०७/२०२४ रोजीचे पत्रामधील अटी व शर्तीनुसार व केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालय यांजकडील दिनांक ०८/११/२०११ व दिनांक २४/११/२०२२ रोजीच्या अधिसूचनेमधील तरतुदीस अधीन राहून उत्खननाचे परवाने देण्यात हरकत नाही, असा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला.

रत्नागिरी जिल्हयातील जगबुडी नदीमधील वाळू/रेती उत्खननासाठीचे राखीव गट यामधून पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या स्थानिक व्यक्तींना तसेच अशा व्यक्तीच्या संस्थांना वाळू/रेतीचे हातपाटीद्वारे (non-mechanised manual method) उत्खनन करण्यासाठी नियमानुसार परवाने देण्याबाबतची पुढील योग्य ती कार्यवाही जिल्हा खनिकर्म अधिकारी, रत्नागिरी यांनी करणेची आहे.

## <u>प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना</u> –

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.

२. मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करावी.

३. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणांची सदयस्थिती सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले. तसेच तपशिलामध्ये दाव्याची सुनावणीची पुढील तारीख व पुढील तारखेचे कारण नमुद करण्यात यावे.

४. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.

५. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.

६. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

७. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत तथापी बराच काळ प्रलंबित आहेत, अशा प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित विभागाची बैठक आयोजित करुन व पाठपुरावा करुन अहवाल प्राप्त होतील याकडे लक्ष पुरवावे.

८. अभिप्राय अपेक्षिलेल्या प्रकरणांमध्ये वेळोवेळी संबंधित विभागास स्मरणपत्र काढणेची कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

**सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना —**

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.

२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.

४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.

५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

**सर्वसाधारण सूचना**

- सागरी किनारा व्यवस्थापन समिती, रत्नागिरी (DCZMA) च्या दरमहा आयोजित करण्यात येणा-या बैठकीचे लेखी पत्र तसेच इतिवृत्त या कार्यालयाच्या अधिकृत ई-मेल द्वारे पाठविणेत येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका अथवा प्रश्न उपस्थित केले नाहीत.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनी बैठकीस उपस्थित राहणेचे असून प्रतिनिधी पाठवू नयेत तसेच बैठकीस उपस्थित राहता येणे शक्य नसल्यास अध्यक्ष यांची पुर्वपरवानगी घेणेची आहे अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

उपस्थितांचे आभार व्यक्त करुन बैठक समाप्त झालेचे जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी**
**यांच्या स्वाक्षरीची.**

**(चंद्रकांत सुर्यवंशी)**
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी

क्र. महसूल/कार्या/अे.के. ६/DCZMA/०८/२०२४
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - ०२/१०/२०२४

प्रतिलिपी - १. सर्व संबंधित सदस्य यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी (ई-मेल द्वारे रवाना).
२. जिल्हा खनिकर्म अधिकारी, रत्नागिरी यांजकडे माहिती व कार्यवाहसाठी
३. अनौपचारिक संदर्भाने महसूल सहाय्यक-४ (L४) यांजकडे माहिती व कार्यवाहीसाठी.

## दिनांक ३०/०९/२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष तसेच दुरभाष्य प्रणाली (व्ही.सी.) द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी | अध्यक्ष |
| २. | प्रतिनिधी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ३. | प्रतिनिधी विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ४. | सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ५. | प्रतिनिधी सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| ६. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| ७. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ९. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| १०. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| ११. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| १२. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| १३. | मुख्याधिकारी, नगर परिषद रत्नागिरी | सदस्य |
| १४. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य |

---

सदर बैठकीसाठी उपस्थित असलेल्या सदस्यांचे सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

### 1. **मा. एमसीझेडएमए, मुंबई कडील प्रलंबित तक्रारींबाबत आढावा –**

मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींच्या अध्यक्षांची बैठक दरमहा आयोजित करण्यात येते. सदर बैठकीमध्ये मा. एमसीझेडएमए, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन करण्यात आलेल्या बांधकामांच्या तक्रींचे अनुषंगाने आढावा घेण्यात येतो.

मा. अध्यक्ष, एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून सन 2019 ते 2024 पर्यंत प्राप्त 33 तक्रारींबाबतचा विहित नमुन्यातील तपशील पुढीलप्रमाणे आहे –

| | Construction in NDZ area within CRZ area | Constructions in CRZ II/ III without CRZ permission from competent authority | Construction beyond CRZ permission | C&D waste/ Debris dumping in Mangroves & its 50 m. buffer, CRZ I | Total |
|---|---|---|---|---|---|
| Complaint received | 07 | 17 | 0 | 08 | 33 |
| Action Taken | 02 | 09 (Complaint Sr. No. 33 is not related to CRZ violation hence to be omitted) | 0 | 07 | 18 |
| Action pending with reason | 05<br>03-Pending at Court for hearing.<br>01-Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>01-Report received from SDO, Dapoli. But pending at this office for compliance report. | 09<br>03- Pending at Court for hearing.<br>02-Pending at Chief Office, Nagar Panchayat /Parishad.<br>03- Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>01-Report received from SDO, Dapoli. But pending at this office for compliance report | 0 | 01<br>01-Pending at Grampanchayat for report | 15 |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असंता तक्रारींचे अनुषंगाने पुर्तता अहवाल सादर करणेवर प्रलंबित तक्रारींची संख्या 09 व मा. न्यायालयात प्रलंबित तक्रारी 6 आहेत. पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधित उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांजकडे पाठविणेत आलेल्या आहेत असे सदस्य सचिव यांनी सांगितले. सदर तक्रारी या सन 2019 पासून प्रलंबित असलेमुळे अध्यक्ष, DCZMA यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांनी अनुपालन अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेची दक्षता घ्यावी तसेच पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई यांजकडे अनुपालन अहवाल सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे अध्यक्षांनी सांगितले.

मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींचे अध्यक्ष यांची दरमहा बैठक आयोजित करण्यात येत असलेमुळे माहे मार्च 2024 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी/ मुख्याधिकारी तथा सदस्य यांना अध्यक्षांनी निर्देश दिले.

तसेच सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन करण्यात आलेबाबतच्या तक्रार अर्जप्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबाबत पर्यावरण विभागाकडील आदर्श कार्यप्रणाली (Standard Operating Procedure-SOP) नुसार सीआरझेड उल्लंघनाची प्रकरणे हाताळून कार्यवाही करणेबाबत सर्व संबंधितांना अध्यक्षांनी पुन:श्च निर्देश दिले.

## 2. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

रत्नागिरी जिल्हयातील सीआरझेड क्षेत्रातील बांधकामाबाबत प्राप्त झालेल्या मा. एमसीझेडएमए, मुंबई व अन्य व्यक्तींकडील तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. –

| उपविभाग | माहे डिसेंबर 2023 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2024 ते सप्टेंबर 2024 मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 17 | 2 | 19 | 2 | 17 | 2 | 15 | 9 | 6 |
| खेड | 3 | 0 | 3 | 1 | 2 | 0 | 2 | 0 | 2 |
| चिपळूण | 9 | 1 | 10 | 3 | 7 | 1 | 6 | 4 | 2 |
| रत्नागिरी | 21 | 2 | 23 | 0 | 23 | 3 | 20 | 11 | 9 |
| राजापूर | 7 | 0 | 7 | 1 | 6 | 1 | 5 | 1 | 4 |
| | 57 | 5 | 62 | 7 | 55 | 7 | 48 | 25 | 23 |

| उपविभाग | MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या | अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या |
|---|---|---|---|
| दापोली | 3 | 12 | 15 |
| खेड | 1 | 1 | 2 |
| चिपळूण | 2 | 4 | 6 |
| रत्नागिरी | 5 | 15 | 20 |
| राजापूर | 2 | 3 | 5 |
| | 13 | 35 | 48 |

माहे जानेवारी 2024 ते सप्टेंबर 2024 मध्ये 07 तक्रारी निकाली करण्यात आलेबाबत सदस्य सचिव यांनी अध्यक्षांचे निदर्शनास आणले. आवक तक्रारी व निकाली तक्रारी यांचा मेळ घेतला असता निकाली तक्रारींची संख्या खूप कमी असलेचे अध्यक्ष यांनी सांगितले. उक्त सर्व प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेबाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत.

सदर तक्रारींचे अनुषंगाने मा. संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 03/10/2024 रोजी बैठक आयोजित करण्यात आले असलेचे सदस्य सचिव यांनी सांगितले.

उपविभागीय अधिकारी खेड व राजापूर यांचे स्तरावरील मोजणीचे प्रकरण बराच कालावधीपासून प्रलंबित आहेत. तरी भूमी अभिलेख विभागाची बैठक आयोजित करुन मोजणीची कार्यवाही प्राधान्याने पुर्ण होईल याकडे लक्ष पुरवावे अश्या सुचना अध्यक्ष यांनी दिल्या. तसेच मुख्याधिकारी स्तरावरील प्रलंबित प्रकरणांमध्ये जिल्हा सह आयुक्त, नपाप्र, रत्नागिरी यांनी विशेष लक्ष दयावे अश्या सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन करुन बांधकाम करणेत आलेबाबतच्या तक्रार अर्जप्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबाबत आदर्श कार्यप्रणाली (Standard Operating Procedure-SOP) नुसार कार्यवाही करणेकामी सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी व उपअधिक्षक भूमी अभिलेख यांजकडील अभिप्राय प्राप्त करुन घ्यावेत. तद्नंतर सीआरझेड तरतूदींनुसार

कार्यवाही करुन स्थळदर्शक नकाशा व संबंधीतांचे जाब-जबाबासहीत स्वयंस्पष्ट चौकशी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी तसेच अन्य विभाग यांनी योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

**3. Preparation of a Shoreline Management Plan (SMP) for the Maharashra Coast by National Centre for Sustainable Coastal Management (NCSCM), Chennai -**

केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाने पर्यावरण (संवर्धन) कायदा 1986 अंतर्गत कोस्टल रेग्युलेशन झोन अधिसूचना 2011 अधिक्रमीत करुन दिनांक 18/01/2019 रोजी सीआरझेड अधिसूचना 2019 प्रकाशित केली आहे. सदर सीआरझेड अधिसूचना 2019 चे तरतूदीनुसार नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेन्ट, चेन्नई या केंद्र शासन प्राधिकृत संस्थेने रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे व पालघर जिल्हयांचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे 2019 तयार करण्याचे काम पुर्ण केले आहे.

मा. एमसीझेडएमए, मुंबई यांनी दिनांक 20/10/2023 रोजीच्या पत्रान्वये रत्नागिरी जिल्हयांचे प्रारुप सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे हे केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयामार्फत मंजूर करण्यात आलेबाबत या कार्यालयास कळविले आहे. तसेच सदरचे मंजुरी पत्र व मंजूर सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (Approved CZMP) मा. एमसीझेडएमए, मुंबई यांच्या अधिकृत वेबसाईट https://mczma.gov.in/ वर प्रसिध्द व उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

सदरचे सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (Approved CZMP) हे 1:25000 हया आधारभूत प्रमाणामध्ये नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेन्ट, चेन्नई या केंद्र शासन प्राधिकृत संस्थेमार्फत तयार करण्यात आलेले आहेत.

उक्त मंजूर सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (Approved CZMP) 1:4000 हया आधारभूत प्रमाणामध्ये तयार करणे, पर्यटन व्यवस्थापन योजना (TMP) आणि महाराष्ट्र किनारपट्टीसाठी किनारपट्टी व्यवस्थापन योजना (SMP) तयार करण्यासाठी समुद्राच्या बाजूला विद्यमान अधिकृत सार्वजनिक घडामोडी/संरचना आणि चक्रीवादळ, वादळ, त्सुनामी यासारख्या काळात बचाव आणि मदत कार्याच्या उद्देशाने चक्रीवादळ आश्रयस्थान, पर्जन्य निवारा, हेलिपॅड आणि रस्त्याच्या जाळ्यासह इतर पायाभूत सुविधांसारखी वैशिष्ट्ये याची माहिती नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेन्ट, चेन्नई या केंद्र शासन प्राधिकृत संस्थेस आवश्यक आहे. उक्त विषयी नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेन्ट, चेन्नई या केंद्र शासन प्राधिकृत संस्थेने आवश्यक माहितीसाठी पाठविलेली विषय सूची मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडील दिनांक 23/08/2024 रोजीच्या पत्रान्वये दिनांक 23/08/2024 रोजीच्या मा. एनसीएससीएम, चेन्नई यांजकडील सहपत्रासह या कार्यालयाकडे प्राप्त झालेली असून संबंधित विभागांना या कार्यालयाकडील दिनांक 30/08/2024 रोजीच्या पत्रान्वये पाठविणेत आलेली होती.

सदर विषयाचे अनुषंगाने पर्यावरण विभागाद्वारे मा. एनसीएससीएम, चेन्नई यांचे उपस्थितीमध्ये दुरभाष्यप्रणालीने दिनांक 09/09/2024 रोजी भागधारकांची/संबंधित विभागांची (Stakeholder) बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त दिनांक 25/09/2024 रोजी ई-मेल द्वारे प्राप्त झाले असुन सदरचे इतिवृत्त संबंधित भागधारक/विभाग (Stakeholder) यांना ई-मेल द्वारे तात्काळ पाठविणेत यावे. तसेच संबंधित भागधारक/विभाग (Stakeholder) यांनी इतिवृत्तामध्ये दिलेल्या सूचनांनुसार योग्य ती कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल सादर करावा.

## 4. Status of violation cases and action taken on violation cases by States/Union Territories as per CRZ Notifications, 2011/2019

मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडील दिनांक 15/06/2023 रोजीच्या पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रामध्ये सीआरझेड तरतूदींचे उल्लंघन करुन करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे, त्यांची सदयस्थिती व त्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करणेचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत अनधिकृत बांधकामाबाबतची यादी प्राप्त झाली असून अनधिकृत बांधकामे व निर्गमित केलेल्या नोटीसांबाबतचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे -

**सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत माहिती**

| पविभागाचे नांव | सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची संख्या | | | निर्गमित केलेल्या नोटिसांची संख्या | | | न्यायालयीन स्तरावर दाखल प्रकरणे | | | स्थगिती आदेश मिळालेली प्रकरणे | | | निष्कासनाचे आदेश पारीत संख्या | | | निष्कासनाची कार्यवाही केलेली संख्या | | | पर्यावरण कायदयांतर्गत गुन्हे दाखल केलेली संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CR. III |
| दापोली | 4 | 0 | 192 | 4 | 0 | 192 | 0 | 0 | 82 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 7 |
| मंडणगड | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 4 | 0 | 193 | 4 | 0 | 193 | 0 | 0 | 82 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 7 |
| खेड | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| चिपळूण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| गुहागर | 0 | 0 | 179 | 0 | 0 | 179 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | [illegible] |
| **एकुण** | 0 | 0 | 179 | 0 | 0 | 179 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| रत्नागिरी | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| संगमेश्वर | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | |
| **एकुण** | 0 | 0 | 145 | 0 | 0 | 145 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| राजापूर | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 494 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| लांजा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| **एकुण** | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 494 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| **जिल्हयाची एकुण** | 4 | 11 | 1017 | 4 | 11 | 1011 | 0 | 0 | 127 | 0 | 0 | 25 | 0 | 0 | 13 | 0 | 0 | 3 | 0 | 0 | 1 |

- उपविभाग राजापूर : राजापूर तालुक्यातील 500 प्रकरणांपैकी 494 प्रकरणांमध्ये नोटिसा देण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. उर्वरित 6 प्रकरणांमध्ये नोटिसा बजावणीचे कामकाज पुर्ण झाले असल्यास सुधारित अहवाल सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी राजापूर यांना अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

## 5. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने आयोजित जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठकीमध्ये समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

a) **कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 संदर्भात अन्य न्यायालयाकडील आदेश अथवा मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 चा अंतीम आदेश यांना अधीन राहून साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेच्या कार्यवाहीबाबत निर्णय घेणेत येईल.

b) **पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –**

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. श्री. अनिल परब व श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचे नांवे असलेल्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करणेबाबत मासिक बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते.

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांजकडील दिनांक 05/04/2024 रोजीचे पत्र या कार्यालयाकडे प्राप्त झाले असून श्री. अनिल परब यांचे नांवे स्थावर जमीन मालमत्ता दाखल असल्याचे दिसून येत नाही असा अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. तसेच श्री. पुष्कर मुळये यांचे जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेणेबाबत तहसीलदार मंडणगड यांना लेखी पत्र दिलेले असुन अदयापपर्यंत अहवाल प्राप्त झाले नसलेबाबत नमुद आहे. तरी तहसीलदार यांना योग्य ती कार्यवाही करणेबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी सूचना दयाव्यात. तसेच पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम वसुल करणेबाबत तहसीलदार दापोली व तहसीलदार खेड यांचेस्तरावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उपविभागीय अधिकारी यांनी पुढील बैठकीपुर्वी सादर करावा अश्या सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

c) **न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही –**

i) **मा. दिवाणी न्यायालय, खेड येथील दावा क्र. 57/2021**

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 रोजीचा आदेश -**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 चे आदेशाविरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय, खेड येथे दिवाणी किरकोळ अपील क्र. 08/2023 दाखल करणेत आले असुन सदर अपीलाची अंतीम सुनावणी दिनांक 04/11/2023 रोजी झालेली असुन अपील मान्य करणेत आले आहे.

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 04/11/2023 रोजीच्या आदेशाविरुध्द अपील -**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 04/11/2023 रोजीच्या आदेशान्वये या कार्यालयामार्फत दाखल अपील मान्य करणेत आले आहे. सदर आदेश रद्द करणेबाबत श्री. सदानंद कदम यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. 14850/2023 दाखल केली असुन दिनांक 11/12/2023 रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सदर याचिका Pre-admission वर आहे.

**सदर दावा प्रकरणी सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन केल्याप्रकरणी केलेल्या कारवाईबाबतचा अहवाल मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांजकडे दिनांक 24/04/2024 रोजीच्या पत्रान्वये सादर करणेत आला आहे.**

सदर रिट याचिका क्र. 14850/2023 चे प्रकरणी दिनांक 14/06/2024 रोजीचे अंतीम सुनावणी आदेशान्वये आदेशातील अटींना अधीन राहून रिट याचिका निकाली ठेवणेत आली आहे. दिनांक 14/06/2024 रोजीचे सुनावणी आदेशातील मुद्दा क्रमांक 16 व 17 चे अवलोकन केले असता वादी यांनी हमीपत्र दिलेचे अनुषंगाने दिनांक 31/07/2024 रोजी पर्यंत रिट याचिका क्र. 11125/2022 मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेमार्फत रिसॉर्टच्या संरचनेचे संरक्षण करण्याचा याचिकाकर्त्याला कोणताही दिलासा न मिळाल्यास अथवा कोणतेही संरक्षणात्मक आदेश पारित न झालेस रिसॉर्टची संपूर्ण रचना 31 ऑगस्ट 2024 रोजी किंवा त्यापूर्वी पाडण्यात येईल, असा आदेश पारित झालेला आहे.

तथापि, वादी यांच्या वकीलांनी दिनांक 31/07/2024 रोजी कायदेशीर कागदपत्र दाखल करुन असे म्हटले आहे की, मा. उच्च न्यायालयाने (in Writ Petiton No. 11125/2022) दिनांक 10 जुलै २०२४ रोजीच्या सुनावणी आदेशान्वये हे प्रकरण कोणत्याही खंडपीठासमोर ठेवू नये ज्याचे न्यायमूर्ती अमित बोरकर सदस्य आहेत, असा आदेश केला आहे. त्यानुसार हे प्रकरण पर्यायी खंडपीठापुढे सूचीबद्ध करण्यात आले आणि हे प्रकरण पोहोचू न शकल्याने मा. उच्च न्यायालयाने (in Writ Petiton No. 14850/2023) याचिकाकर्त्याला/वादीला या रिट याचिकेत मुदतवाढ मागण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

त्यानुसार प्रस्तुत दावा प्रकरणी सुनावणीची पुढील तारीख दिनांक 30/09/2024 रोजी ठेवण्यात आली आहे.

- **निशाणी-33 वरील अपीलबाबत -**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांजकडील निशाण 33 वरील दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द फेरतपासणी अपील क्र. Writ Petition WPST 26447/2023 उपविभागीय अधिकारी दापोली यांनी दिनांक 26/09/2023 रोजी दाखल केले आहे. सदर रिट याचिका Pre-admission वर आहे.

- **हस्तांतरण अर्जाबाबत (Transfer Application) -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दावा क्र. रेमुनं. 57/2021 दाखल आहे. सदर दावा हस्तांतरीत करणेबाबत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात Civil M.A. 11/2023 अन्वये हस्तांतरण अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी श्री. सदानंद गंगाराम कदम तर्फे ॲड. नेने हजर झाले आहेत. प्रस्तुत अर्ज प्रकरणी अर्जदाराच्या युक्तीवादावर प्रलंबित आहे.

सदर दिवाणी किरकोळ अर्जाच्या अनुषंगाने ॲड. अे.अे.फणसेकर, प्र.जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता रत्नागिरी यांनी दिनांक 14/08/2024 रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे या कार्यालयास कळविले आहे – खेड येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर श्री. निसळ यांची अमरावती येथे बदली झाली असलेने त्यांना कार्यमुक्त करण्यात आलेले आहे. व त्यांचे जागी श्री. टोकळे यांनी दिवाणी न्यायाधीश व. स्तर या पदाचा कार्यभार स्विकारलेला आहे. प्रस्तुत प्रकरण हे श्री. टोकळे यांचे न्यायालयात चौकशीस प्रलंबित आहे. सदर परिस्थितीत ज्या न्यायिक अधिका-याचे विरुध्द हस्तांतरण अर्ज दाखल केला आहे, त्यांची बदली झाली असलेने व त्यांचे जागी नवीन न्यायिक अधिकारी असलेने प्रस्तुत प्रकरणी हे निरर्थक व संदर्भहिन (infructuous) झाले आहे. अशा परिस्थितीत सदर प्रकरण पुढे न चालवता ते मागे घेणे उचित असल्याचे मत असुन सदर प्रकरण पुढे चालवायचे अगर कसे? यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाचे अभिप्राय व सूचना देणेची विनंती केली आहे. प्रकरणी योग्य तो निर्णय कायदेशीर बाबींचे अनुषंगाने घेणे योग्य राहील असे सदस्य सचिव यांनी सांगितले. यावर अध्यक्ष यांनी त्यास अनुमोदन दिले.

पुढील सुनावणीची तारीख दिनांक 30/09/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

- **पुढील सुनावणी –**

रेमुनं. 57/2021 दाव्यामध्ये वादीने निशाणी 62 वर म्हणणे देणेसाठी, साक्षयादी देणेसाठी दिनांक 09/02/2024 रोजीची तारखी निश्चित करण्यात आली होती. तथापी सदर दावा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका 14850/2023 मधील पुढील आदेशास अधीन राहुन पुढील सुनावणीची तारीख दिनांक 30/09/2024 रोजी पर्यंत स्थगित करण्यात आला आहे.

**ii) <u>मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथील अर्ज क्र. 58/2021</u>**

श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 02/05/2023 रोजी झाली असुन सदर दावा फेटाळून लावणेत (Dismissed) आला आहे.

**iii) <u>मा. दिवाणी न्यायालय,खेड येथील दावा क्र. 12/2022</u>**

मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, दापोली यांचे न्यायालयात 1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19, 15 व 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील क्रिमीनल रिव्हीजन अर्ज क्र. 11/2022 प्रलंबित असुन सदर अर्जावरील न्यायनिर्णय होईपर्यंत उक्त दावा अर्ज 12/2022 स्थगितीवर ठेवण्यात आलेला आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 22/10/2024 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

**iv) <u>मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील दावा क्र. 11125/2022</u>**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक 25/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11125/2022 दाखल केले आहे.

सदर दाव्यामध्ये अतिरिक्त मुद्दयांच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र आणि Interim Application उपविभागीय अधिकारी दापोली यांचेमार्फत दिनांक 04/10/2023 रोजी दाखल करणेत आले आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 03/10/2024 रोजी निश्चित करण्यात आली असून सदर दावा PRE-ADMISSION वर आहे.

## 6. मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएक्स/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत - डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर केलेले अतिक्रमण म.ज.म.अ.1966 चे कलम 50(3) व कलम 53 नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 च्या बाहेरील अतिक्रमण करण्यात आलेली शासकीय जमीन ही गाळाने तयार झालेली किना-यालगतची जमीन (Foreshore Land) आहे. सबब सीआझेड तरतूदींचे अनुषंगाने प्रशासकीय विभाग म्हणुन पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे? याबाबत मिळणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव मा. संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे त्यांचे अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तथापि अदयाप पर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

## 7. तत्कालीन मंडळ अधिकारी, मुरुड यांचेविरुध्द करण्यात आलेली कारवाई –

मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांजकडील दिनांक 24/03/2023 रोजीचे पत्रान्वये पोलीस निरीक्षक, दापोली पोलीस ठाणे यांजकडील दिनांक 20/03/2023 रोजीचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालाचे अवलोकन केले असता, पोलीस ठाणे दापोली यांचे येथे दाखल गुन्हा रजि. नं. 177/2023 मध्ये श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांना आरोपी करण्यात आले असुन त्यांना दिनांक 15/03/2023 रोजी अटक करण्यात आली होती. श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांची मा. न्यायालयाने दिनांक 20/03/2023 रोजी जामीनावर मुक्तता केलेली आहे. श्री. पारदुले यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

## <u>प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना</u> –

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जांमध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.

२. मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करावी.

३. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणांची सदयस्थिती सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले. तसेच तपशिलामध्ये दाव्याचीं सुनावणीची पुढील तारीख व पुढील तारखेचे कारण नमुद करण्यात यावे.

४. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.

५. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.

६. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

७. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत तथापी बराच काळ प्रलंबित आहेत, अशा प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित विभागाची बैठक आयोजित करुन व पाठपुरावा करुन अहवाल प्राप्त होतील याकडे लक्ष पुरवावे.

८. अभिप्राय अपेक्षिलेल्या प्रकरणांमध्ये वेळोवेळी संबंधित विभागास स्मरणपत्र काढणेची कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

## <u>सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना</u> –

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.

२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.
४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.
५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.
७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.
८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

**सर्वसाधारण सूचना**

- सागरी किनारा व्यवस्थापन समिती, रत्नागिरी (DCZMA) च्या दरमहा आयोजित करण्यात येणा-या बैठकीचे लेखी पत्र तसेच इतिवृत्त या कार्यालयाच्या अधिकृत ई-मेल द्वारे पाठविणेत येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका अथवा प्रश्न उपस्थित केले नाहीत.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनी बैठकीस उपस्थित राहणेचे असून प्रतिनिधी पाठवू नयेत तसेच बैठकीस उपस्थित राहता येणे शक्य नसल्यास अध्यक्ष यांची पुर्वपरवानगी घेणेची आहे अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

उपस्थितांचे आभार व्यक्त करुन बैठक समाप्त झालेचे जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी**
**यांच्या स्वाक्षरीची.**

**(चंद्रकांत सुर्यवंशी)**
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी

क्र. महसूल/कार्या/अे.के. ६/DCZMA/०९/२०२४
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - १६/१२/२०२४

प्रतिलिपी - १. सर्व संबंधित सदस्य यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी (ई-मेल द्वारे रवाना).
२. अनौपचारिक संदर्भाने महसूल सहाय्यक-४ (L४) यांजकडे माहिती व कार्यवाहीसाठी.

**दिनांक ३१/१२/२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समितीच्या (DCZMA) आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त**

---

सदर सभेस खालीलप्रमाणे समितीमधील अध्यक्ष व इतर सदस्य असलेले अधिकारी/ कर्मचारी प्रत्यक्ष तसेच दुरभाष्य प्रणाली (व्ही.सी.) द्वारे उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी रत्नागिरी | अध्यक्ष |
| २. | प्रतिनिधी जिल्हा पोलीस अधिक्षक रत्नागिरी | सदस्य |
| ३. | प्रतिनिधी जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख रत्नागिरी | सदस्य |
| ४. | प्रतिनिधी विभागीय वन अधिकारी चिपळूण | सदस्य |
| ५. | सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी | सदस्य |
| ६. | सहाय्यक आयुक्त, मत्स्य व्यवसाय रत्नागिरी | सदस्य |
| ७. | उपविभागीय अधिकारी दापोली | सदस्य |
| ८. | उपविभागीय अधिकारी खेड | सदस्य |
| ९. | उपविभागीय अधिकारी चिपळूण | सदस्य |
| १०. | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी | सदस्य |
| ११. | उपविभागीय अधिकारी राजापूर | सदस्य |
| १२. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी | सदस्य |
| १३. | उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण | सदस्य |
| १४. | मुख्याधिकारी, नगर परिषद रत्नागिरी /गुहागर | सदस्य |
| १५. | श्री. विठ्ठल भालेकर, रा. वेलदूर, ता. गुहागर | सदस्य |
| १६. | निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य |

---

सदर बैठकीसाठी उपस्थित असलेल्या सदस्यांचे सदस्य सचिव, जिल्हास्तरीय कोस्टल झोन मॉनेटरींग समिती, तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

**1. मा. एमसीझेडएमए, मुंबई कडील प्रलंबित तक्रारींबाबत आढावा –**

मा. प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींच्या अध्यक्षांची बैठक दरमहा आयोजित करण्यात येते. सदर बैठकीमध्ये मा. एमसीझेडएमए, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन करण्यात आलेल्या बांधकामांच्या तक्रारींचे अनुषंगाने आढावा घेण्यात येतो.

मा. अध्यक्ष, एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून सन 2019 ते 2024 पर्यंत प्राप्त 37 तक्रारींबाबतचा विहित नमुन्यातील तपशील पुढीलप्रमाणे आहे –

| | Construction in NDZ area within CRZ area | Constructions in CRZ II/ III without CRZ permission from competent authority | Construction beyond CRZ permission | Illegal dredging of mineral | C&D waste/ Debris dumping in Mangroves & its 50 m. buffer, CRZ I | Total |
|---|---|---|---|---|---|---|
| **Complaint received** | 07 | 18 | 0 | 02 | 10 | 37 |
| **Action Taken** | 02 | 09 | 0 | 0 | 09 | 20 |
| **Action pending with reason** | 05<br>04-Pending at Court for hearing.<br>01-Report received from SDO, Dapoli. But pending at this office for compliance report. | 09<br>03- Pending at Court for hearing.<br>02-Pending at Chief Office, Nagar Panchayat /Parishad.<br>03- Pending at Sub Divisional Office for report (site inspection and measurement).<br>01-Report received from SDO, Dapoli. But pending at this office for compliance report | 0 | 02<br>02-Pending at Mining Branch | 01<br>01-Pending at this office of further reference | 17 |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता तक्रारींचे अनुषंगाने पुर्तता अहवाल सादर करणेवर प्रलंबित तक्रारींची संख्या 10 व मा. न्यायालयात प्रलंबित तक्रारी 7 आहेत. पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत प्राप्त झालेल्या तक्रारी संबंधित उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांजकडे पाठविणेत आलेल्या आहेत असे सदस्य सचिव यांनी सांगितले. सदर तक्रारी या सन 2019 पासून प्रलंबित असलेमुळे अध्यक्ष, DCZMA यांनी नाराजी व्यक्त केली. संबंधित उपविभागीय अधिकारी आणि मुख्याधिकारी नगर पंचायत/नगर परिषद यांनी अनुपालन अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेची दक्षता घ्यावी तसेच पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई यांजकडे अनुपालन अहवाल सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे असे अध्यक्षांनी सांगितले.

मा. प्रधान सचिव पर्यावरण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समितींचे अध्यक्ष यांची दरमहा बैठक आयोजित करण्यात येत असलेमुळे माहे जून 2024 पुर्वीच्या प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करुन त्यांचे चौकशी अहवाल पुढील

बैठकीपुर्वी या कार्यालयाकडे सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी/ मुख्याधिकारी तथा सदस्य यांना अध्यक्षांनी निर्देश दिले.

तसेच सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन करण्यात आलेबाबतच्या तक्रार अर्जप्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबाबत पर्यावरण विभागाकडील आदर्श कार्यप्रणाली (Standard Operating Procedure-SOP) नुसार सीआरझेड उल्लंघनाची प्रकरणे हाताळून कार्यवाही करणेबाबत सर्व संबंधितांना अध्यक्षांनी पुन:श्च निर्देश दिले.

## 2. प्राप्त तक्रारींबाबत कार्यवाहीचा अहवाल

रत्नागिरी जिल्हयातील सीआरझेड क्षेत्रातील बांधकामाबाबत प्राप्त झालेल्या मा. एमसीझेडएमए, मुंबई व अन्य व्यक्तींकडील तक्रारींबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. –

| उपविभाग | माहे डिसेंबर 2023 अखेर प्रलंबित तक्रारींची संख्या | माहे जानेवारी 2024 ते डिसेंबर 2024 मध्ये प्राप्त तक्रारींची संख्या | एकुण तक्रारींची संख्या | निकाली तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवाल प्राप्त प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी अहवालासाठी प्रलंबित प्रकरणांची संख्या | शिल्लक तक्रारींपैकी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे | उपविभागीय अधिकारी यांचेकडे प्रलंबित |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दापोली | 17 | 4 | 21 | 4 | 17 | 2 | 15 | 9 | 6 |
| खेड | 3 | 0 | 3 | 1 | 2 | 0 | 2 | 0 | 2 |
| चिपळूण | 9 | 1 | 10 | 2 | 8 | 1 | 7 | 5 | 2 |
| रत्नागिरी | 21 | 3 | 24 | 0 | 24 | 3 | 21 | 11 | 10 |
| राजापूर | 7 | 0 | 7 | 1 | 6 | 1 | 5 | 1 | 4 |
| | 57 | 8 | 65 (DMO:2) | 8 | 57 | 7 | 50 | 26 | 24 |

| **उपविभाग** | **MCZMA कडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **अन्य व्यक्तींकडील प्रलंबित तक्रारींची संख्या** | **एकुण तक्रारींची संख्या** |
|---|---|---|---|
| दापोली | 3 | 12 | 15 |
| खेड | 1 | 1 | 2 |
| चिपळूण | 4 | 3 | 7 |
| रत्नागिरी | 6 | 15 | 21 |
| राजापूर | 2 | 3 | 5 |
| | 16 | 34 | 50 |

माहे जानेवारी 2024 ते डिसेंबर 2024 मध्ये 08 तक्रारी निकाली करण्यात आलेबाबत सदस्य सचिव यांनी अध्यक्षांचे निदर्शनास आणले. आवक तक्रारी व निकाली तक्रारी यांचा मेळ घेतला असता निकाली तक्रारींची संख्या खूप कमी असलेचे अध्यक्ष यांनी सांगितले. उक्त सर्व प्रलंबित तक्रारी अर्जामध्ये सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेबाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आले आहेत.

सदर तक्रारींचे अनुषंगाने मा. संचालक, पर्यावरण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे अध्यक्षतेखाली दिनांक 03/10/2024 रोजी बैठक आयोजित करण्यात आले असलेचे सदस्य सचिव यांनी सांगितले.

उपविभागीय अधिकारी खेड व राजापूर यांचे स्तरावरील मोजणीचे प्रकरण बराच कालावधीपासून प्रलंबित आहेत. तरी भूमी अभिलेख विभागाची बैठक आयोजित करुन मोजणीची कार्यवाही प्राधान्याने पुर्ण होईल याकडे लक्ष पुरवावे अश्या सुचना

अध्यक्ष यांनी दिल्या. तसेच मुख्याधिकारी स्तरावरील प्रलंबित प्रकरणांमध्ये जिल्हा सह आयुक्त, नपाप्र, रत्नागिरी यांनी विशेष लक्ष दयावे अश्या सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन करुन बांधकाम करणेत आलेबाबतच्या तक्रार अर्जप्रकरणी करावयाच्या कार्यवाहीबाबत आदर्श कार्यप्रणाली (Standard Operating Procedure-SOP) नुसार कार्यवाही करणेकामी सहाय्यक संचालक, नगर रचना रत्नागिरी व उपअधिक्षक भूमी अभिलेख यांजकडील अभिप्राय प्राप्त करुन घ्यावेत. तद्नंतर सीआरझेड तरतूदींनुसार कार्यवाही करुन स्थळदर्शक नकाशा व संबंधीतांचे जाब-जबाबासहीत स्वयंस्पष्ट चौकशी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपविभागीय अधिकारी तसेच अन्य विभाग यांनी योग्य ती कार्यवाही करावी असे निर्देश अध्यक्ष यांनी दिले.

## 3. Preparation of a Shoreline Management Plan (SMP) for the Maharashra Coast by National Centre for Sustainable Coastal Management (NCSCM), Chennai -

सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (Approved CZMP) हे 1:25000 हया आधारभूत प्रमाणामध्ये नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेन्ट, चेन्नई या केंद्र शासन प्राधिकृत संस्थेमार्फत तयार करण्यात आलेले आहेत.

उक्त मंजूर सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (Approved CZMP) 1:4000 हया आधारभूत प्रमाणामध्ये तयार करणे, पर्यटन व्यवस्थापन योजना (TMP) आणि महाराष्ट्र किनारपट्टीसाठी किनारपट्टी व्यवस्थापन योजना (SMP) तयार करण्यासाठी समुद्राच्या बाजूला विद्यमान अधिकृत सार्वजनिक घडामोडी/संरचना आणि चक्रीवादळ, वादळ, त्सुनामी यासारख्या काळात बचाव आणि मदत कार्याच्या उद्देशाने चक्रीवादळ आश्रयस्थान, पर्जन्य निवारा, हेलिपॅड आणि रस्त्याच्या जाळ्यासह इतर पायाभूत सुविधांसारखी वैशिष्ट्ये याची माहिती नॅशनल सेंटर फॉर सस्टेनेबल कोस्टल मॅनेजमेन्ट, चेन्नई या केंद्र शासन प्राधिकृत संस्थेस आवश्यक आहे.

सदर विषयाचे अनुषंगाने पर्यावरण विभागाद्वारे मा. एनसीएससीएम, चेन्नई यांचे उपस्थितीमध्ये दुरभाष्यप्रणालीने दिनांक 09/09/2024 रोजी भागधारकांची/संबंधित विभागांची (Stakeholder) बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त दिनांक 25/09/2024 रोजी ई-मेल द्वारे प्राप्त झाले असुन सदरचे इतिवृत्त संबंधित भागधारक/विभाग (Stakeholder) यांना ई-मेल द्वारे दिनांक 30/09/2024 चे पत्रान्वये पाठविणेत आले आहे. संबंधित भागधारक/विभाग (Stakeholder) यांनी इतिवृत्तामध्ये दिलेल्या सूचनांनुसार योग्य ती कार्यवाही करावी व अनुपालन अहवाल सादर करावा तसेच ज्या विभागाची माहिती प्राप्त झालेली आहे त्या विभागांची माहिती मा. पर्यावरण विभागास सादर करावी असे अध्यक्ष यांनी निर्देश दिले.

## 4. Status of violation cases and action taken on violation cases by States/Union Territories as per CRZ Notifications, 2011/2019

मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मुंबई यांजकडील दिनांक 15/06/2023 रोजीच्या पत्रान्वये सीआरझेड क्षेत्रामध्ये सीआरझेड तरतूदींचे उल्लंघन करुन करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे, त्यांची सदयस्थिती व त्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करणेचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत अनधिकृत बांधकामाबाबतची यादी प्राप्त झाली असून अनधिकृत बांधकामे व निर्गमित केलेल्या नोटीसांबाबतचा गोषवारा पुढीलप्रमाणे आहे -

**सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत माहिती**

| उपविभागाचे नांव | सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांची संख्या | | | निर्गमित केलेल्या नोटिसांची संख्या | | | न्यायालयीन स्तरावर दाखल प्रकरणे | | | स्थगिती आदेश मिळालेली प्रकरणे | | | निष्कासनाचे आदेश पारीत संख्या | | | निष्कासनाची कार्यवाही केलेली संख्या | | | पर्यावरण कायदयांतर्गत गुन्हे दाखल केलेली संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III | CRZ I | CRZ II | CRZ III |
| दापोली | 4 | 0 | 192 | 4 | 0 | 192 | 0 | 0 | 82 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 7 |
| मंडणगड | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 4 | 0 | 193 | 4 | 0 | 193 | 0 | 0 | 82 | 0 | 0 | 24 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 7 |
| खेड | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| **एकुण** | 0 | 11 | 0 | 0 | 11 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| चिपळूण | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| गुहागर | 0 | 0 | 179 | 0 | 0 | 179 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | [illegible] |
| **एकुण** | 0 | 0 | 179 | 0 | 0 | 179 | 0 | 0 | 38 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| रत्नागिरी | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 139 | 0 | 0 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 7 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| संगमेश्वर | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| **एकुण** | 0 | 0 | 145 | 0 | 0 | 145 | 0 | 0 | 6 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| राजापूर | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 494 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| लांजा | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| **एकुण** | 0 | 0 | 500 | 0 | 0 | 494 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | [illegible] |
| **जिल्हयाची एकुण** | 4 | 11 | 1017 | 4 | 11 | 1011 | 0 | 0 | 127 | 0 | 0 | 25 | 0 | 0 | 13 | 0 | 0 | 3 | 0 | 0 | [illegible] |

➢ उपविभाग राजापूर : राजापूर तालुक्यातील 500 प्रकरणांपैकी 494 प्रकरणांमध्ये नोटिसा देण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून 6 प्रकरणे अहवाल प्राप्त नसलेमुळे नोटिसा काढणेवर प्रलंबित आहेत.

**5. मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत -**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 मध्ये सीआरझेड अधिसूचनेतील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत रिसॉर्ट व रस्त्याचे साई रिसॉर्ट एनएक्स व सी कौंच रिसॉर्ट यांनी केलेल्या बांधकामावर कारवाई करणेबाबत मा. MoEF&CC, नवी दिल्ली यांनी निर्गमीत केलेले दिनांक 22/08/2022 रोजीचे निर्देश या कार्यालयाकडे मा. अवर सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडून दिनांक 25/08/2022 रोजीचे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत.

सदर पत्राचे अनुषंगाने आयोजित जिल्हास्तरीय सागरी किनारा व्यवस्थापन समिती (DCZMA) च्या बैठकीमध्ये समितीचे मान्यतेने निर्णय घेण्यात आले असून संबंधीत सर्व अधिकारी/यंत्रणा यांना कार्यवाही करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत.

**a) कार्यारंभ आदेशानुसार बांधकाम निष्कासनाबाबत –**

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट क्र. 446 संदर्भात अन्य न्यायालयाकडील आदेश अथवा मा. दिवाणी न्यायालय, खेड यांचे न्यायालयात दाखल दावा क्र. 57/2021 चा अंतीम आदेश यांना अधीन राहून साई रिसॉर्ट एनएक्सचे बांधकाम निष्कासन करणेच्या कार्यवाहीबाबत निर्णय घेणेत येईल.

**b) पर्यावरणीय नुकसान भरपाईबाबत –**

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांनी दिनांक 14/02/2023 रोजीचे पत्रान्वये पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम जमीन महसूल वसूली म्हणून वसूल करणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर केला आहे. श्री. अनिल परब व श्री. पुष्कर श्रीकृष्ण मुळये यांचे नांवे असलेल्या अन्य जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेवून महसूल वसुली प्रमाणपत्र या कार्यालयाकडे सादर करणेबाबत उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 21/02/2023 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस अवगत करणेबाबत मासिक बैठकीमध्ये निर्देश देण्यात आले होते.

उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, चिपळूण यांजकडील दिनांक 05/04/2024 रोजीचे पत्र या कार्यालयाकडे प्राप्त झाले असून श्री. अनिल परब यांचे नांवे स्थावर जमीन मालमत्ता दाखल असल्याचे दिसून येत नाही असा अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. तसेच श्री. पुष्कर मुळये यांचे जमिनीचा/मालमत्तेचा शोध घेणेबाबत तहसीलदार मंडणगड यांना लेखी पत्र दिलेले असुन अदयापपर्यंत अहवाल प्राप्त झाले नसलेबाबत नमुद आहे. तरी तहसीलदार यांना योग्य ती कार्यवाही करणेबाबत संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी सूचना दयाव्यात. तसेच पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम वसुल करणेबाबत तहसीलदार दापोली व तहसीलदार खेड यांचेस्तरावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उपविभागीय अधिकारी यांनी लेखी कळवावा. तसेच उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळूण यांना या कार्यालयाकडील दिनांक 16/10/2024 रोजीचे पत्रान्वये महसूल वसुली प्रमाणपत्राचा परिपुर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत कळविणेत आले आहे.

तथापी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळूण यांजकडील प्रस्ताव अदयापपर्यंत या कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही. तरी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ चिपळूण यांनी पर्यावरणीय नुकसान भरपाईची रक्कम वसुल करणेकामी महसूल वसुली प्रमाणपत्राचा परिपुर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत योग्य ती कार्यवाही तात्काळ करावी.

**c) न्यायालयीन बाबींबाबत कार्यवाही –**

**i) मा. दिवाणी न्यायालय, खेड येथील दावा क्र. 57/2021**

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 रोजीचा आदेश -**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 17/03/2023 चे आदेशाविरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय, खेड येथे दिवाणी किरकोळ अपील क्र. 08/2023 दाखल करणेत आले असुन सदर अपीलाची अंतीम सुनावणी दिनांक 04/11/2023 रोजी झालेली असुन अपील मान्य करणेत आले आहे.

- **मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 04/11/2023 रोजीच्या आदेशाविरुध्द अपील -**

मा. दिवाणी न्यायालय, खेड यांजकडील दिनांक 04/11/2023 रोजीच्या आदेशान्वये या कार्यालयामार्फत दाखल अपील मान्य करणेत आले आहे. सदर आदेश रद्द करणेबाबत श्री. सदानंद कदम यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. 14850/2023 दाखल केली असुन दिनांक 11/12/2023 रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सदर याचिका Pre-admission वर आहे.

**सदर दावा प्रकरणी सीआरझेड अधिसूचनेचे उल्लंघन केल्याप्रकरणी केलेल्या कारवाईबाबतचा अहवाल मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांजकडे दिनांक 24/04/2024 रोजीच्या पत्रान्वये सादर करणेत आला आहे.**

सदर रिट याचिका क्र. 14850/2023 चे प्रकरणी दिनांक 14/06/2024 रोजीचे अंतीम सुनावणी आदेशान्वये आदेशातील अटींना अधीन राहून रिट याचिका निकाली ठेवणेत आली आहे. दिनांक 14/06/2024 रोजीचे सुनावणी

आदेशातील मुद्दा क्रमांक 16 व 17 चे अवलोकन केले असता वादी यांनी हमीपत्र दिलेचे अनुषंगाने दिनांक 31/07/2024 रोजी पर्यंत रिट याचिका क्र. 11125/2022 मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेमार्फत रिसॉर्टच्या संरचनेचे संरक्षण करण्याचा याचिकाकर्त्याला कोणताही दिलासा न मिळाल्यास अथवा कोणतेही संरक्षणात्मक आदेश पारित न झालेस रिसॉर्टची संपूर्ण रचना 31 ऑगस्ट 2024 रोजी किंवा त्यापूर्वी पाडण्यात येईल, असा आदेश पारित झालेला आहे.

तथापि, वादी यांच्या वकीलांनी दिनांक 31/07/2024 रोजी कायदेशीर कागदपत्र दाखल करुन असे म्हटले आहे की, मा. उच्च न्यायालयाने (in Writ Petiton No. 11125/2022) दिनांक 10 जुलै २०२४ रोजीच्या सुनावणी आदेशान्वये हे प्रकरण कोणत्याही खंडपीठासमोर ठेवू नये ज्याचे न्यायमूर्ती अमित बोरकर सदस्य आहेत, असा आदेश केला आहे. त्यानुसार हे प्रकरण पर्यायी खंडपीठापुढे सूचीबद्ध करण्यात आले आणि हे प्रकरण पोहोचू न शकल्याने मा. उच्च न्यायालयाने (in Writ Petiton No. 14850/2023) याचिकाकर्त्याला/वादीला या रिट याचिकेत मुदतवाढ मागण्याचे स्वातंत्र्य दिले आहे.

त्यानुसार, 31 जुलै 2024 च्या आदेशाने दिलेल्या संरक्षणासाठी दिनांक 30 नोव्हेंबर 2024 पर्यंत अखेरची मुदतवाढ वाढविण्यात आलेली आहे.

- **निशाणी-33 वरील अपीलबाबत -**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांजकडील निशाण 33 वरील दिनांक 11/10/2022 चे आदेशाविरुध्द फेरतपासणी अपील क्र. Writ Petition WPST 26447/2023 उपविभागीय अधिकारी दापोली यांनी दिनांक 26/09/2023 रोजी दाखल केले आहे. सदर रिट याचिका Pre-admission वर आहे.

- **हस्तांतरण अर्जाबाबत (Transfer Application) -**

मा. दिवाणी न्यायाधीश, वरीष्ठ स्तर, खेड यांचे न्यायालयात दावा क्र. रेमुनं. 57/2021 दाखल आहे. सदर दावा हस्तांतरीत करणेबाबत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात Civil M.A. 11/2023 अन्वये हस्तांतरण अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादी श्री. सदानंद गंगाराम कदम तर्फे ॲड. नेने हजर झाले आहेत. प्रस्तुत अर्ज प्रकरणी अर्जदाराच्या युक्तीवादावर प्रलंबित आहे.

सदर दिवाणी किरकोळ अर्जाच्या अनुषंगाने ॲड. अे.अे.फणसेकर, प्र.जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता रत्नागिरी यांनी दिनांक 14/08/2024 रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे या कार्यालयास कळविले आहे – खेड येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर श्री. निसळ यांची अमरावती येथे बदली झाली असलेने त्यांना कार्यमुक्त करण्यात आलेले आहे. व त्यांचे जागी श्री. टोकळे यांनी दिवाणी न्यायाधीश व. स्तर या पदाचा कार्यभार स्विकारलेला आहे. प्रस्तुत प्रकरण हे श्री. टोकळे यांचे न्यायालयात चौकशीस प्रलंबित आहे. सदर परिस्थितीत ज्या न्यायिक अधिका-याचे विरुध्द हस्तांतरण अर्ज दाखल केला आहे, त्यांची बदली झाली असलेने व त्यांचे जागी नवीन न्यायिक अधिकारी असलेने प्रस्तुत प्रकरणी हे निरर्थक व संदर्भहिन (infructuous) झाले आहे. अशा परिस्थितीत सदर प्रकरण पुढे न चालवता ते मागे घेणे उचित असल्याचे मत असुन सदर प्रकरण पुढे चालवायचे अगर कसे? यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाचे अभिप्राय व सूचना देणेची विनंती केली आहे. प्रकरणी योग्य तो निर्णय कायदेशीर बाबींचे अनुषंगाने घेणे योग्य राहील असे सदस्य सचिव यांनी सांगितले. यावर अध्यक्ष यांनी त्यास अनुमोदन दिले.

त्यानुसार सदर प्रकरणी दिवाणी किरकोळ अर्ज क्र. 11/2023 मागे घेणेबाबत कायदेशीर प्रक्रियेनुसार कार्यवाही करणेस या कार्यालयाची हरकत नसलेबाबत प्र.जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता रत्नागिरी यांना दिनांक 02/10/2024 रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. त्याप्रमाणे दिनांक 17/12/2024 रोजीचे सुनावणी आदेशान्वये उक्त दावा अर्ज पुढे चालविणेचा नसलेबाबतची पुरशीस दिलेवरुन निकाली ठेवणेत आला आहे.

- पुढील सुनावणी –

रेमुनं. 57/2021 दाव्यामध्ये वादीने निशाणी 62 वर म्हणणे देणेसाठी, साक्षयादी देणेसाठी दिनांक 09/02/2024 रोजीची तारखी निश्चित करण्यात आली होती. तथापी सदर दावा मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका 14850/2023 मधील पुढील आदेशास अधीन राहुन पुढील सुनावणीची तारीख दिनांक 31/01/2025 रोजी पर्यंत स्थगित करण्यात आला आहे.

### ii) मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे येथील अर्ज क्र. 58/2021

श्री. किरीट सोमय्या यांनी मौजे मुरुड, ता.दापोली येथील गट.नं 446 मधील बांधकामाबाबत 58/2021 अन्वये मा. राष्ट्रीय हरित लवाद वेस्टर्न झोन बेंच पुणे येथे दावा दाखल केला आहे. सदर दाव्याची सुनावणी दिनांक 02/05/2023 रोजी झाली असुन सदर दावा फेटाळून लावणेत (Dismissed) आला आहे.

### iii) मा. दिवाणी न्यायालय,दापोली येथील दावा क्र. 12/2022

मा. पर्यावरण, वन आणि जलवायू परिवर्तन मंत्रालय, एकात्मिक प्रादेशिक कार्यालय, नागपुर द्वारा श्री. सुरेशकुमार अडप्पा, शास्त्रज्ञ-डी यांनी मा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, दापोली यांचे न्यायालयात 1. श्री. अनिल दत्तात्रय परब, 2. साई रिसॉर्ट एनएक्स 3. सी कौंच रिसॉर्ट यांचे विरुध्द पर्यावरण (संरक्षण) कायदा अधिनियम 1986 मधील कलम 19, 15 व 7 अन्वये रेग्युलर क्रिमीनल केस नंबर 12/2022 अन्वये दावा दाखल केलेला आहे. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील क्रिमीनल रिव्हीजन अर्ज क्र. 11/2022 प्रलंबित असुन सदर अर्जावरील न्यायनिर्णय होईपर्यंत उक्त दावा अर्ज 12/2022 स्थगितीवर ठेवण्यात आलेला आहे. पुढील सुनावणीची तारीख दिनांक 10/01/2025 रोजी निश्चित करण्यात आली आहे.

### iv) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील दावा क्र. 11125/2022

मौजे मुरुड, ता. दापोली येथील सर्व्हे नं. 446 मधील साई रिसॉर्ट एनएक्स या रिसॉर्टचे सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्याबाबत सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल, मुंबई यांचेकडील दिनांक 31/01/2022 चे ज्ञापन व अंमलबजावणी पत्र दिनांक 22/08/2022 व उपविभागीय अधिकारी, दापोली यांचेकडील दिनांक 25/08/2022 चे पत्र रदद करण्याबाबत श्री. सदानंद गंगाराम कदम यांनी भारत सरकार व इतर यांचेविरुध्द मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे Writ Petition No.11125/2022 दाखल केले आहे.

सदर दाव्यामध्ये अतिरिक्त मुद्दयांच्या अनुषंगाने प्रतिज्ञापत्र आणि Interim Application उपविभागीय अधिकारी दापोली यांचेमार्फत दिनांक 04/10/2023 रोजी दाखल करणेत आले आहे.

प्रस्तुत दावा प्रकरणी मा. न्यायालयाने दिनांक 21/11/2024 रोजीच्या सुनावणीचे वेळी दावा निकाली ठेवलेबाबतचा अंतीम आदेश पारित करण्यात आला आहे. सदर अंतीम आदेशानुसार वादी यांना मा. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाचा पर्यायी उपाय उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

## 6. मौजे मुरुड, ता. दापोली येथील समुद्र किना-यावरील साई रिसॉर्ट एनएकस/ सी कौंच रिसॉर्ट यांनी सरकारी जमिनीवर अतिक्रमण करुन बांधकाम केलेबाबत व भूमिगत ड्रेनेज पाईपलाईन बाबत - डॉ. किरीट सोमैया यांचा तक्रारी अर्ज

मौजे मुरुड, ता. दापोली येथील स.नं 446 लगत पश्चिम दिशेच्या समुद्रावरील वाळूवर केलेले अतिक्रमण म.ज.म.अ.1966 चे कलम 50(3) व कलम 53 नुसार दिलेल्या नोटीसप्रमाणे संबंधितांनी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हे मुदतीत काढून टाकलेले आहे.

मौजे मुरुड, ता. दापोली येथील गट नं. 446 च्या बाहेरील अतिक्रमण करण्यात आलेली शासकीय जमीन ही गाळाने तयार झालेली किना-यालगतची जमीन (Foreshore Land) आहे. सबब सीआझेड तरतूदींचे अनुषंगाने प्रशासकीय विभाग म्हणुन पर्यावरण (संरक्षण आणि संवर्धन) अधिनियम 1986 चे कलम 15(1) प्रमाणे फिर्याद दाखल करावी अगर कसे? याबाबत मिळणेबाबत या कार्यालयाकडील दिनांक 18/01/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव मा. संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे त्यांचे अभिप्रायासह मा. शासन, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडे सादर करणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तथापि अदयाप पर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

## 7. तत्कालीन मंडळ अधिकारी, मुरुड यांचेविरुध्द करण्यात आलेली कारवाई –

मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, रत्नागिरी यांजकडील दिनांक 24/03/2023 रोजीचे पत्रान्वये पोलीस निरीक्षक, दापोली पोलीस ठाणे यांजकडील दिनांक 20/03/2023 रोजीचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे.

सदर अहवालाचे अवलोकन केले असता, पोलीस ठाणे दापोली यांचे येथे दाखल गुन्हा रजि. नं. 177/2023 मध्ये श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांना आरोपी करण्यात आले असुन त्यांना दिनांक 15/03/2023 रोजी अटक करण्यात आली होती. श्री. सुधीर शांताराम पारदुले, तत्कालीन मंडळ अधिकारी मुरुड यांची मा. न्यायालयाने दिनांक 20/03/2023 रोजी जामीनावर मुक्तता केलेली आहे. श्री. पारदुले यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

## प्राप्त तक्रारींबाबत सर्वसाधारण सूचना –

१. प्रलंबित तक्रारी या ब-याच कालावधीपासून प्रलंबित असलेचे दिसून येते. तरी प्रलंबित तक्रारी अर्जामध्ये तात्काळ स्थळपहाणी करुन सीआरझेड तरतूदींचे अनुषंगाने कार्यवाही करुन प्रकरणनिहाय अनुपालन अहवाल तात्काळ सादर करणेत येईल याकडे विशेष लक्ष पुरवावे.
२. मा. एमसीझेडएमए, मुंबई यांजकडून प्राप्त होणा-या प्रकरणांमध्ये तात्काळ कार्यवाही करावी.
३. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणांची सदयस्थिती सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले. तसेच तपशिलामध्ये दाव्याची सुनावणीची पुढील तारीख व पुढील तारखेचे कारण नमुद करण्यात यावे.
४. न्यायालयीन स्तरावर प्रलंबित प्रकरणी अपिल दाखल करुन घेण्यात आले असल्यास अपिलाचा क्रमांक व सुनावणीची पुढील तारीख तपशिलामध्ये नमुद करण्यात यावी.
५. न्यायप्रविष्ट प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी पाठपुरावा करावा. तसेच सुनावणी तारखेस उपस्थित रहावे व दरमहा सदयस्थितीचा अहवाल कार्यालयास सादर करावा.
६. FIR दाखल प्रकरणांमध्ये सदयस्थितीचा अहवाल दर महाचे बैठकीपुर्वी सादर करणेबाबत सर्व उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.
७. ज्या प्रकरणी नगर रचना विभाग/ भूमी अभिलेख विभागांचे अभिप्राय अपेक्षिलेले आहेत तथापी बराच काळ प्रलंबित आहेत, अशा प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित विभागाची बैठक आयोजित करुन व पाठपुरावा करुन अहवाल प्राप्त होतील याकडे लक्ष पुरवावे.
८. अभिप्राय अपेक्षिलेल्या प्रकरणांमध्ये वेळोवेळी संबंधित विभागास स्मरणपत्र काढणेची कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी यांना सांगण्यात आले.

## सीआरझेड क्षेत्रामधील अनधिकृत बांधकामाबाबत सर्वसाधारण सूचना –

१. सर्व्हेक्षणामध्ये आढळून आलेल्या बांधकामाची यादी तयार करुन त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणेत आलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावी.

२. सीआरझेड क्षेत्रात बांधकामे होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

३. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांचेस्तरावर संबंधित विभागाची मासिक बैठक घेवून आढावा घ्यावा.

४. अकृषीक परवानगी तसेच बांधकाम परवानगीसाठी आलेल्या अर्जांबाबत सहाय्यक संचालक नगर रचना विभागाचे अभिप्राय घ्यावेत. सागरतटिय क्षेत्रात येणा-या महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ग्रामपंचायत व इतर ठिकाणी कोणत्याही बांधकामास परवानगी देण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अॅथोरिटी किंवा केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाची पूर्व परवानगी प्राप्त असल्याची खातरजमा संबंधितांनी करावयाची आहे. पूर्व परवानगी नसताना सागरतटिय क्षेत्रात कोणत्याही कामांना अनुमती देण्यात येवू नये.

५. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये नियोजनाचे अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगर रचना, रत्नागिरी यांनी तात्काळ अभिप्राय सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

६. सागरतटिय क्षेत्रातील निवासी/ वाणिज्य बांधकाम प्रकरणांमध्ये सीआरझेड परवानगीचे प्रस्ताव तात्काळ महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट अॅथोरिटीकडे उपविभागीय अधिकारी यांनी सादर करावेत. तसेच दरमहा अहवाल सादर करावा.

७. सीआरझेड व कांदळवनासाठी शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करावे.

८. सीआरझेड क्षेत्रातील अनधिकृत/विनापरवाना बांधकाम प्रकरणांमध्ये उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत भूमी अभिलेख विभागाकडे मोजणीसाठी पाठविण्यात येणा-या प्रकरणांमध्ये भूमी अभिलेख विभागाने शासकीय मोजणी करुन दयावी.

## सर्वसाधारण सूचना

- सागरी किनारा व्यवस्थापन समिती, रत्नागिरी (DCZMA) च्या दरमहा आयोजित करण्यात येणा-या बैठकीचे लेखी पत्र तसेच इतिवृत्त या कार्यालयाच्या अधिकृत ई-मेल द्वारे पाठविणेत येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

वरीलप्रमाणे विचारविनीमय/चर्चा करुन जे निर्णय सर्वानुमते घेण्यात आले त्याबाबत आणखी काही शंका असल्यास त्यांचे निरसन सर्वानुमते करणेसाठी त्या उपस्थित करणेबाबत समिती सदस्य व संबंधित विभाग/यंत्रणा यांना विचारणा करण्यात आली असता कोणीही शंका अथवा प्रश्न उपस्थित केले नाहीत.

पुढील बैठकीस जे सदस्य असतील त्यांनी बैठकीस उपस्थित राहणेचे असून प्रतिनिधी पाठवू नयेत तसेच बैठकीस उपस्थित राहता येणे शक्य नसल्यास अध्यक्ष यांची पुर्वपरवानगी घेणेची आहे अशा सूचना अध्यक्ष यांनी दिल्या.

उपस्थितांचे आभार व्यक्त करुन बैठक समाप्त झालेचे जाहीर केलेवरुन बैठक समाप्त करण्यात आली.

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी**
**यांच्या स्वाक्षरीची.**

(चंद्रकांत सुर्यवंशी)
सदस्य सचिव, सागरी किनारा व्यवस्थापन समिती,
रत्नागिरी तथा निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी

क्र. महसूल/कार्या/अे.के. ६/DCZMA/१२/२०२४
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक - ०६/०३/२०२५

प्रतिलिपी - १. सर्व संबंधित सदस्य यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी (ई-मेल द्वारे रवाना).
२. अनौपचारिक संदर्भाने महसूल सहाय्यक-४ (L४) यांजकडे माहिती व कार्यवाहीसाठी.